DAILY THANEVAIBHAV RNI REGD NO. 27878/ 75, POSTAL NO. THC/186/2018-2021

कल्याण-डोंबिवली, नवी मुंबई, मीरा-भाईंदर, अंबरनाथ-बदलापूर, भिवंडी, उल्हासनगर, मुरबाड, शहापूर.

www.thanevaibhav.in

# ठाणेवैभव

ठाणे जिल्ह्याचे सर्वाधिक खपाचे परिपूर्ण दैनिक | इष्ट ते छापणार | संस्थापक : नरेन्द्र बल्लाळ

भारतीय सौर दिनांक कार्तिक ३० शके १९४४ | वर्ष ४७ | अंक ५६ | शुक्रवार २२ ऑक्टोबर २०२१ | पाने ८ | रु. ४

संपादक : मिलिन्द बल्लाळ

## फार्स संपणार ?

>>अग्रलेख / 5

**फ्लेमिंगो क्षेत्राची सीमा घटली; गृह प्रकल्पांचे आभाळ वाढले**

>>पान 3

**फेरीवाल्याचा पालिकेच्या पथकावर प्राणघातक हल्ल्याचा प्रयत्न**

>>पान 3







# कल्याण-डोंबिवलीत अभ्यासिकांमध्ये विद्यार्थ्यांची गजबज



**डोंबिवली :** अनेक नोकरदार अजूनही घरातून कार्यालयीन कामे करीत आहेत. एकेका घरात दोन ते तीन जणांचे कार्यालयीन काम. त्यांचे मोबाइलवरील बोलणे, घरातील लहान मुलांचा धिंगाणा. त्यामुळे घरात शांततेने, मन लावून अभ्यास करता येत नसल्याने अशा घरांमधील स्पर्धा तसेच महाविद्यालयीन परीक्षा देणारे विद्यार्थी अभ्यासिकांकडे वळले आहेत. करोना संसर्गामुळे अभ्यासिकांमध्ये 50 टक्के उपस्थितीची अट असल्याने विद्यार्थी, अभ्यासिका चालकांची मोठी अडचण झाली आहे.

डोंबिवली, कल्याणमधील सेवाभावी वृत्तीने, व्यावसायिक पद्धतीने सेवा देणाऱ्या 10 ते 15 अभ्यासिका आहेत. सेवाभावी वृत्तीने सेवा देणाऱ्या अभ्यासिकांमध्ये 100 ते 150 रुपये मासिक दरात विद्यार्थ्यांना अभ्यास करता येतो. अशा अभ्यासिकांकडे विद्यार्थ्यांचा अधिक ओढा आहे. खासगी व्यावसायिक अभ्यासिकांमध्ये 800 ते 900 रुपये मासिक दर आकारला जातो. बहुतांशी अभ्यासिकांची आसनक्षमता 150 ते 200 आहे. करोना प्रतिबंधक नियमांमुळे अभ्यासिका चालकांना निम्म्या विद्यार्थ्यांना अभ्यासिकेत प्रवेश द्यावा लागतो. एका बाकड्यावर एक विद्यार्थी बसविला जातो. इतर विद्यार्थी जागा असूनही बसविता येत नाहीत, अशी खंत अभ्यासिका चालकांनी व्यक्त केली.

महाराष्ट्र लोकसेवा, केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षा, सनदी लेखापाल, अभियांत्रिकी, वैद्यकीय, वास्तुविशारद, कायदा, महाविद्यालयीन विद्यार्थी अभ्यासिकांचे सदस्य आहेत. अनेक मुले चाळ, झोपडी भागात राहतात. त्यांना अभ्यासिका मोठा आधार असतो. उच्चभ्रू वस्तीमधील मुले घरातील गजबजलेल्या वातावरणामुळे आणि विद्यार्थी समूहात शांतपणे अभ्यास करता येत असल्याने अभ्यासिकांना पसंती देतात, असे कल्याणच्या सार्वजनिक वाचनालयाचे अध्यक्ष प्रा. राजीव जोशी यांनी सांगितले. सार्वजनिक वाचनालयाची कल्याण पश्चिमेतील संतोषी माता रस्त्यावर रिजन्सी सोसायटीत 150 आसन क्षमतेची अभ्यासिका आहे.

डोंबिवलीत विवेकानंद सेवा मंडळाचे इंजिनीअरिग, वैद्यकीय, कायदा अभ्यासक्रमाच्या पुस्तकांचे ग्रंथालय आहे. या मंडळाची 120 आसनक्षमतेची डोंबिवली पूर्वेतील संगीतावाडीमध्ये अभ्यासिका आहे. करोना प्रतिबंधक नियमांमुळे गेल्या दीड वर्षांपासून अभ्यासिका बंद आहे. स्पर्धा परीक्षा इतर अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांचा अभ्यासिका सुरु करा, असा तगादा लागला आहे. त्यामुळे करोना प्रतिबंधाचे नियम पाळून 50 टक्के क्षमतेत सोमवारपासून अभ्यासिका सुरु करण्याचा निर्णय घेतला आहे, असे विवेकानंद सेवा मंडळाचे कार्यकर्ते अनिल मोकल यांनी सांगितले.

**डोंबिवलीत गणेश मंदिर संचालित आचार्य अत्रे वाचनालयात 150 आसनक्षमतेची अद्ययावत अभ्यासिका आहे. 50 टक्के क्षमतेने ही अभ्यासिका सुरु केली आहे. अभ्यासिकेव्यतिरक्त ज्येष्ठ नागरिक कट्टा, वाचनालय, संगणक, अंध संगणक कक्षाच्या जागा अभ्यासिकेसाठी विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिल्या आहेत. दीड वर्ष विद्यार्थी स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करीत आहेत. या परीक्षा आता होऊ घातल्या आहेत. अशा निर्णायक क्षणी विद्यार्थी शांत जागा म्हणून अभ्यासिकांना प्राधान्य देत आहेत, असे अत्रे वाचनालय अभ्यासिकेचे समन्वयक प्रवीण दुधे यांनी सांगितले. डोंबिवलीत राजाजी रस्ता येथे पै फ्रेन्ड्स ग्रंथालयाची 100 आसन क्षमतेची अभ्यासिका आहे. 24 तास ही अभ्यासिका सुरु आहे.**



## रुग्णवाहिकेतच महिलेची प्रसूती, चालक डॉक्टरांचे कौतुक

**मोखाडा :** मोखाड्यातील चास ग्रामपंचायतीमधील महिलेला प्रसूतीसाठी 108 रुग्णवाहिकेतून दवाखान्यात नेण्यात येत होते; मात्र महिलेला प्रसूतीच्या वेदना असह्य झाल्याने रुग्णवाहिका रस्त्याच्या कडेला लावून महिलेची सुरक्षित प्रसूती डॉक्टरांनी केली. महिला व बाळ सुरक्षित असल्याचे डॉक्टरांनी सांगितले.

चास ग्रामपंचायतीमधील अतिदुर्गम चिखलपाड्यातील कमल युवराज पांढरे (25) या आदिवासी गरोदर महिलेस प्रसूती कळा येऊ लागल्याने तिच्या नातेवाईकांनी 108 रुग्णवाहिकेला फोन केला. दुपारी 12.10 च्या सुमारास जव्हारच्या 108 रुग्णवाहिकेतून डॉ. मोमिन मोझाझ यांनी तासाभराच्या आत चिखलपाडा गाठला. गरोदर मातेला घेऊन रुग्णवाहिका मोखाडा ग्रामीण रुग्णालयाकडे निघाली; मात्र वाटेतच कमलला प्रसूती कळा असह्य झाल्या आणि तिची प्रसूतीची वेळ आली. त्या वेळी रुग्णवाहिकेचे चालक मनोज भोये धावून आले.

## मास्क न वापरणाऱ्यांवर नवी मुंबई महापालिकेची नजर



**वाशी :** कोरोना आटोक्यात येत असल्याने सरकारने निर्बंध शिथिल करून हॉटेल व्यावसायिकांना सूट दिली आहे. त्यामुळे नवी मुंबई पालिकेकडून हॉटेलवर होणाऱ्या कारवाईला ब्रेक लागणार आहे. मात्र, पालिकेने हॉटेलसाठी नेमलेले पथक आता मास्कवरील कारवाईकडे वळवण्यात येणार आहे. मास्क न वापरणाऱ्यांवर पालिकेकडून कारवाई करण्यात येणार आहे. तसे आदेश पालिका आयुक्तांनी दिले आहेत.

कोरोनाची दुसरी लाट ओसरली असून नवी मुंबईकरांना कोरोनावरील रामबाण उपाय असणाऱ्या त्रिसूत्रीचा विसर पडल्याचे दिसून येत आहे. त्यातच कोरोनावरील निर्बंध आता शिथिल करण्यात आले आहे. त्यामुळे नागरिक बिनधास्तपणे वावरत आहेत. कोरोनाचे सक्रिय रुग्णांची संख्याही पाचशेच्या आत आली आहे. त्यामुळे नवी मुंबईकरांनी सुटकेचा निःश्वास सोडला असून बिनधास्तपणे नियमांचे उल्लघंन होत आहे.

हॉटेल चालकांनाही नेहमीप्रमाणेच वेळ दिली आहे. त्यामुळे आता पालिका अधिकारी हॉटेलवर कारवाई करु शकत नाही. सध्या पालिका आयुक्त हॉटेलसाठी नेमण्यात आलेले पथक मास्कवरील कारवाईसाठी वापरणार आहे. तशा सूचनाही त्यांनी संबधित अधिकाऱ्यांना दिल्या आहेत. कोरोना आटोक्यात यावा, यासाठी मास्कवरील कारवाई कडक करण्यात येणार असल्याचे पालिका आयुक्तांनी स्पष्ट केले.

# एनएमएमटीच्या बसस्थानकात १३० बस पडून



**नवी मुंबई :** केंद्र शासनाच्या 'फेम' याजनेअंतर्गत नवी मुंबई परिवहन उपक्रमाच्या ताफ्यात आतापर्यंत 180 विद्युत बस दाखल झाल्या आहेत. मात्र यातील फक्त 50 बस प्रवाशांच्या सेवेत आहेत. 130 बस या एनएमएमटीच्या बसस्थानकात पडून आहेत. पेट्रोल व डिझेल दरवाढीमुळे परिवहन उपक्रम तोट्यात असताना या विद्युत बस का सुरु करण्यात येत नसल्याने नाराजी व्यक्त होत आहे.

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी नुकतीच महापालिकेत आढावा बैठक घेतली. यात डिझेलवरील बस सीएनजीत रूपांतरित करा व विद्युत बसचा वापर वाढवा अशा सूचना पालिका प्रशासनाला केल्या आहेत. त्यानंतर विद्युत बस सुरु करण्याबाबत परिवहन प्रशासनाचे नियोजन नाही. 130 पर्यावरण पूरक विद्युत बस करावे सेक्टर 48 आणि सारसोळे बस आगारात धूळखात उभ्या आहेत. कोरोनानंतर एनएमएमटीचा तोटा वाढला असून यात तीन कोटींची भर पडली आहे. परिवहनकडे एकूण 400 बसगाड्या आहेत. त्यातील 300 बसगाड्या सध्या प्रवाशी वाहतूक करीत आहेत. यात 50 विद्युत तर 220 या डिझेल आणि सीएनजीवरील आहेत. डिझेलवर चालणाऱ्या बसला प्रति 250 ते 300 किलोमीटर अंतरासाठी दिवसाला 10 हजार ते 12 हजार रुपये खर्च येतो. या 130 बस सेवा देत असून त्यांचा दिवसाला 15 लाख ते 16 लाख तर महिन्याला 3 ते 4 कोटी इंधनावर खर्च होत आहे. त्यामुळे 120 विद्युत बसगाड्या सेवेत दाखल झाल्या तर हा खर्च कमी होणार आहे.

विद्युत बससाठी आवश्यक चार्जिंग केंद्रे उपलब्ध नाहीत. त्याचे काम सुरु असून लवकरच तुर्भे आणि घसणोली येथे हे चार्जिंग केंद्र सुरु करण्यात येणार आहेत. सर्व विद्युत बस लवकरच सुरु करण्यात येतील, असे नवी मुंबई परिवहन उपक्रमाचे व्यवस्थापक योगेश कडूस यांनी सांगितले.


# वसईतील मिठाचा हंगाम लांबणार



**विरार :** वसई तालुक्यातील मिठाचा हंगाम यंदा लांबणीवर पडण्याची चिन्हे आहेत. साधारण सप्टेंबरअखेर मिठाच्या नव्या हंगामाला सुरुवात होते; परंतु पावसामुळे मिठाचा हंगाम लांबणीवर पडल्याने त्याचा फटका मीठ उत्पादकांना बसू लागला आहे. इतर व्यवसायाला ज्याप्रमाणे मदतीचा हात दिला जातो, त्याप्रमाणे मीठ उत्पादकांनाही केंद्र सरकारने मदतीचा हात द्यावा, अशी मागणी तालुक्यातील मीठ उत्पादक शेतकऱ्यांकडून केली जात आहे.

मिरा-भाईंदर, नायगाव, वसई, नालासोपारा, वैतरणा, सफाळे, केळवे, पालघर या ठिकाणी मोठ्या प्रमाणात मिठागरे आहेत. साधारण मार्च, एप्रिल आणि मेदरम्यान मिठाचे उत्पादन होते. पावसाळ्यात मिठाचे डोंगर करून त्यावर गवत टाकून ते झाकले जाते आणि पावसाळा संपला की गवत काढून नवा हंगाम सुरु होतो. मात्र पावसामुळे ही मिठागरे आता उशिराने खुली होणार आहेत. गेल्या दीड-दोन वर्षांपासून मजूर नसल्याने मिठागरे बंद पडली आहेत. जोराच्या पावसामुळे अनेक वेळा मीठ वाहून गेले आहे; परंतु केंद्र सरकारने अद्यापपर्यंत मदतीचा हात दिला नसल्याने मीठ उत्पादकांवर उपासमारीची वेळ आली आहे.

सध्या निसर्गचक्र बदलले आहे. पावसाच्या पाण्यावर मिठाचा व्यवसाय आहे. खाड्या बुजवल्याने त्याचा फटका जसा शहरांना बसतो, तसाच तो मिठाच्या शेतीलाही बसतो. मजुरांचा तुटवडा असे एक ना अनेक प्रश्न सतावत आहेत.



## दिवाळीसाठी पनवेलच्या मॅजिक दिव्यांना मागणी

**नवीन पनवेल :** ग्रामीण आणि आदिवासी बांधवांना रोजगार उपलब्ध करून देणाऱ्या पनवेल तालुक्यातील युसूफ मेहेरअली सेंटरमध्ये दिवाळीसाठी विविध प्रकारचे दिवे बनविले जात आहेत. मात्र खास मागणी आहे ती मॅजिक दिव्यांना हे दिवे बनविण्यासाठी केंद्रात लगबग सुरु असल्याची माहिती प्रकल्प संचालक सुरेश रासम यांनी दिली.

केंद्राच्या ग्रामोद्योगातील कुंभारकाम विभागांमध्ये दिवाळीच्या पार्श्वभूमीवर पणत्या, लामणदिवे, निरंजन, चारदिवे, मॅजिक दिवे बनविले जातात. प्रकाश तांबे, राजेंद्र ठाकूर आणि विजय रासम हे निव्वळ कला जोपासली जावी म्हणून हे दिवे बनवतात. संस्थेच्या बांधनवाडी, पनवेल आणि मुंबईतील गावदेवी या विक्री केंद्रांसह विविध कंपन्यांच्या सी एस आर उपक्रमांतर्गत या वस्तूंची विक्री केली जाते.

एमएमआर क्षेत्रातील पहिली पालिका

# १०० टक्के नवी मुंबईकरांना लशीचा पहिला डोस



**नवी मुंबई :** अनेक संकटांवर मात करीत अखेर नवी मुंबई महापालिकेने 18 वर्षांवरील 100 टक्के नागरिकांना कोविड प्रतिबंधक लशीचा पहिला डोस देण्यात यश मिळवले आहे. कमी वेळेत जास्तीत जास्त लाभार्थींना लशीचा पहिला डोस देणारी नवी मुंबई महापालिका एमएमआर क्षेत्रात पहिली; तर राज्यात दुसरी ठरली आहे. नवी मुंबईपूर्वी पुणे महापालिका 11 ऑक्टोबरच्या आधी 100 टक्के नागरिकांना पहिला डोस देण्यात यशस्वी ठरली आहे.

नवी मुंबईत मार्च 2021 पासून कोविड लसीकरणाला सुरुवात झाली. तेव्हा तब्बल 11 लाख सात हजार 233 नागरिक पहिल्या डोससाठी पात्र ठरले. त्यानुसार पालिकेने लसीकरण सत्रांना प्रारंभ केला. सुरुवातीला दोन महिने मुबलक प्रमाणात लसपुरवठा झाला. नंतर तिसऱ्या महिन्याच्या दरम्यान लशीचा पुरवठा थांबला. अशा परिस्थितीतही महापालिकेने लसीकरण थांबवले नाही.

45 वर्षांवरील आणि सहव्याधी असलेल्यांसाठी येत असणाऱ्या लशींमधून लसीकरण सुरुच ठेवले. त्यानुसार पालिकेने काही सामाजिक संस्थांतर्फेही लसीकरण करून घेतले. शहरातील वंचित, सुपरस्प्रेडर्स आणि आधारकार्ड नसणाऱ्यांची वर्गवारी करून त्यांना लस दिली. महापालिकेत जाऊ न शकणाऱ्यांसाठी 'लस आपल्या दारी' उपक्रम राबवून तब्बल सात हजारांपेक्षा जास्त नागरिकांना लस देण्यात आली. महापालिकेच्या विविध प्रयत्नांमुळे 100 टक्के नागरिकांना पहिला डोस देण्यात यश आले आहे.

**दुसऱ्या डोससाठी 52 टक्के लसीकरण**

नवी मुंबईतील पाच लाख 76 हजार 567 नागरिकांना दुसरा डोस देण्यात आला आहे. दुसऱ्या डोससाठी 52 टक्के लसीकरण पार पडले आहे. तब्बल 16 लाख 83 हजार 800 नागरिकांना डोस देण्यात पालिकेला यश आले आहे. पात्र ठरलेल्यांपेक्षा जास्त नागरिकांना पहिला डोस दिल्यामुळे पालिकेला 100.2 टक्के लसीकरण करता आले आहे.

# मिरा-भाईंदरचा पाणीपुरवठा सुरळीत!

**भाईंदर :** आगामी सणासुदीच्या काळात मिरा-भाईंदरमध्ये पाण्याचा कोणताही शटडाऊन अथवा जलवाहिन्यांच्या देखभाल-दुरुस्तीचे काम हाती न घेण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. पाणीटंचाईच्या मुद्द्यावर पालिका आयुक्तांनी एमआयडीसी आणि स्टेम प्राधिकारणाच्या अधिकाऱ्यांसमवेत आज बैठक आयोजित केली होती. या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला आहे.

मिरा-भाईंदरला पाणीपुरवठा करणाऱ्या एमआयडीसीने आधी घेतलेला शटडाऊन आणि त्यानंतर सलग दोन वेळा फुटलेली जलवाहिनी यामुळे 10 ते 12 दिवसांपूर्वी शहरात तीव्र पाणीटंचाई निर्माण झाली होती. सतत पडणाऱ्या पावसामुळे धरणे काठोकाठ भरलेली असतानाही ही कृत्रिम पाणीटंचाई निर्माण झाल्यामुळे नागरिकांमध्ये मोठा असंतोष पसरला होता. याच पार्श्वभूमीवर पालिका आयुक्त दिलीप ढोले यांनी एमआयडीसी आणि स्टेम प्राधिकरणाचे अधिकारी यांची संयुक्त बैठक घेतली.

आगामी दिवाळी आणि इतर सण लक्षात घेऊन या काळात कोणत्याही प्रकारचा शटडाऊन अथवा जलवाहिन्याच्या देखभाल-दुरुस्तीसाठी मिरा-भाईंदरचा पाणीपुरवठा बंद ठेवण्यात येऊ नये, एखादी जलवाहिनी फुटलीच तर युद्ध पातळीवर तिच्या दुरुस्तीचे काम पूर्ण करून कमीत कमी काळ पाणीपुरवठा खंडित होईल, याची दक्षता घेण्यात यावी, अशा सूचनाही आयुक्तांनी दिल्या आहेत.

**एक थेंबही कमी चालणार नाही**

स्टेम प्राधिकरणाकडून मिरा-भाईंदरला 86 दशलक्ष लिटर पाणी मंजूर असतानाही दररोज सुमारे 80 दशलक्ष लिटर पाण्याचा पुरवठा होतो. शहराला 86 दशलक्ष लिटर पाण्यापेक्षा एक थेंबही कमी पाणीपुरवठा चालणार नाही, असे आयुक्तांनी संबंधितांना सांगितले. तसेच यावर देखरेख ठेवण्यासाठी अतिरिक्त आयुक्त, शहर अभियंता आणि कार्यकारी अभियंता यांची समिती गठित करण्यात आली आहे. वीजपुरवठा खंडित होऊन पाणीपुरवठ्यावर परिणाम होऊ नये यासाठी स्वतंत्र फिडर बसवण्याचा निर्णय या वेळी घेण्यात आला. शहरातील पाणीपुरवठ्यावर परिणाम करणाऱ्या बेकायदा नळजोडण्या शोधून काढून त्या तातडीने तोडण्याचे आदेशही देण्यात आले आहेत.



## यंदा "नोव्हेंबर हिट" राहणार हवामान शास्त्रज्ञांचा अंदाज

**ठाणे :** 'मान्सून पॅटर्न' बदलला आहे. त्यामुळेच यंदा 28 ऑगस्ट ते 7 सप्टेंबर दरम्यान पावसाने जोर धरल्याचे दिसले. पुढील ऋतुचक्रावर याचा परिणाम होणार असून यंदा ऑक्टोबर नाही तर 'नोव्हेंबर हिट' चा सामना करावा लागणार असल्याची शक्यता हवामान शास्त्रज्ञांनी व्यक्त केली आहे.

वातावरणीय बदलामुळे ऋतुचक्रात ही बदल झाल्याचे जाणवले. पावसाळ्यानंतर ऑक्टोबर महिन्यात उष्मा वाढून उन्हाच्या झळा सहन कराव्या लागतात. यंदा मात्र ऑक्टोबर महिन्यातील कमाल तापमान सरासरीच्या जवळ राहील, नोव्हेंबरमध्ये मात्र वातावरणातील उष्मा वाढण्याची शक्यता असल्याने 'नोव्हेंबर हिट'च्या झळा सोसाव्या लागणार आहेत असे शास्त्रज्ञांनी सांगितले.

डिसेंबरमध्ये वातावरणातील अस्थितता वाढण्याची शक्यता आहे. परिणामी पावसाचा सरी कोसळण्याचा अंदाज आहे. यादरम्यान बहुतांश भागात गारपीट होण्याची शक्यता देखील आहे.

# कल्याण-डोंबिवलीत रिक्षाचालकांना शिस्त लावण्यासाठी प्रयत्न सुरु

**कल्याण :** कल्याण-डोंबिवली शहरात रिक्षाचालकांना शिस्त लावण्यासाठी आरटीओ आणि वाहतूक पोलिसांकडून प्रयत्न सुरु असले तरी रिक्षाचालकांची मुजोरी कमी झालेली नाही. करोना निर्बंध सैल झाल्यानंतर आरटीओकडून रिक्षातून तीन प्रवाशांची वाहतूक करण्यास परवानगी देत रिक्षाचे शेअर भाडेदर जाहीर करण्यात आले आहेत. मात्र, प्रत्यक्षात रिक्षातून चार प्रवाशांची वाहतूक करत रिक्षाचालकांकडून प्रवाशांना वेठीस धरण्याबरोबरच प्रवाशांची लूट करण्याचे प्रकार सुरु आहेत. यामुळे प्रवासी संघटनांनी नाराजी व्यक्त केली आहे.

रिक्षातून तीन प्रवाशांची वाहतूक करण्यास परवानगी असली तरी प्रत्यक्षात रिक्षाचालकांकडून चार प्रवाशांची वाहतूक केली जाते. तीन प्रवाशांना मागच्या सीटवर तर एक प्रवासी चालकाच्या बाजूच्या सीटवर अर्धवट स्थितीत बसून इच्छित स्थळापर्यंत प्रवास करतो. अशा प्रकारे चार प्रवाशांची वाहतूक करण्यास आरटीओची परवानगी नसल्यामुळे अनेकदा चौकात वाहतूक पोलिस उभा असल्यास चालकाकडून पुढे बसलेल्या प्रवाशाला उतरवून त्याला चौकात चालत येण्यास भाग पाडले जाते. प्रवासीदेखील गर्दीच्या वेळी रिक्षा मिळत नसल्यामुळे चौथ्या सीटवरुन प्रवास करण्यास तयार होतात. मात्र, या प्रवाशाकडूनदेखील भाड्याचे पूर्ण पैसे घेतले जातात. वास्तविक आरटीओकडून रिक्षाचे भाडेदर ठरविताना रिक्षा संघटनांशी चर्चा करून सर्वेक्षण करून हे दर ठरवले जातात. पेट्रोल आणि डीझेलचे दर गगनाला भिडले असले तरी शहरातील रिक्षा सीएनजीवर चालत असून सीनएनजीचे दर सध्या तरी आटोक्यात आहेत. तरीही रिक्षाचालकांकडून प्रवाशाची लूट केली जात आहे. याला वाहतूक पोलिस आणि आरटीओची मूक संमती असल्यानेच रिक्षा चालकांची मनमानी सुरु असल्याचा आरोप होत आहे.



आरटीओकडून रिक्षाचालकाचे शेअर रिक्षाचे दर ठरविताना रिक्षातून तीन प्रवासी किती किलोमीटर प्रवास करणार आणि तितक्या किलोमीटरसाठी किती लिटर पेट्रोल लागणार, हा खर्च तीन प्रवाशांमध्ये विभागून रिक्षा भाडे ठरवले जाते. आता करोनानंतर रिक्षाचालकांकडून भाडे वाढविण्यात आले असून रिक्षाचालक नव्या भाडे दराने प्रवाशांकडून भाडे वसूल करत आहेत.

## डोंबिवलीतील क्रिकेट खेळपट्ट्या खासगी संस्थेकडे



**डोंबिवली :** डोंबिवलीतील सावळाराम महाराज क्रीडा संकुलातील क्रिकेट खेळपट्ट्या निविदा प्रक्रिया पूर्ण होण्यापूर्वीच महापालिकेने एका खासगी क्रिकेट प्रशिक्षण संस्थेकडे दिल्याने डोंबिवलीतील क्रिकेट प्रशिक्षण संस्था चालकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. डोंबिवलीतील सावळाराम महाराज क्रीडा संकुलात चार क्रिकेट खेळपट्ट्या आहेत. या खेळपट्ट्यांवर डोंबिवली शहर परिसरातील क्रिकेटचे प्रशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना क्रिकेट प्रशिक्षण संस्थांकडून प्रशिक्षण दिले जाते. दीड वर्षांपूर्वी डोंबिवलीतील 'बॉइज क्रिकेट क्लब'चे राजन धोत्रे यांनी या खेळपट्ट्या पालिकेच्या सहकार्याने विकसित केल्या. करोना महामारीमुळे दीड वर्षांत सर्व व्यवहार ठप्प असल्याने नव्याने विकसित केलेल्या खेळपट्ट्यांवर मुलांना क्रिकेटचे धडे देणे कोणत्याही क्रिकेट प्रशिक्षण संस्थेला जमले नव्हते.

बिवली क्रीडा संकुलातील क्रिकेट खेळपट्ट्या प्रशिक्षणासाठी उपलब्ध करुन द्याव्यात म्हणून डोंबिवलीतील क्रिकेट प्रशिक्षण संस्थांनी पालिका प्रशासनाकडे मागणी केली होती. अधिकाऱ्यांनी निविदा प्रक्रिया राबवून स्पर्धात्मक पद्धतीने क्रिकेट खेळपट्ट्या क्रिकेट संस्थांना देण्यात येतील, असे उत्तर महापालिकेच्या संबंधित विभागाने या संस्थांना दिले होते. दरम्यान, गेल्या काही दिवसांपासून सावळाराम महाराज क्रीडा संकुलातील क्रिकेट खेळपट्ट्यांवर क्रिकेट प्रशिक्षण सुरु होणार असल्याचे फलक डोंबिवली जिमखाना, घरडा सर्कल भागात कल्याणमधील एका खासगी क्रिकेट प्रशिक्षण संस्थेने लावले आहेत.

निविदा प्रक्रिया पालिकेने पूर्ण केली नसताना अचानक क्रीडा संकुलातील खेळपट्ट्यांवर क्रिकेट प्रशिक्षण वर्ग सुरु होण्याचे फलक शहरात झळकू लागल्याने प्रशिक्षण संस्थांनी आश्चर्य व्यक्त केले आहे.

> **"क्रीडा संकुलातील चारही खेळपट्ट्या आपण विकसित केल्या आहेत. त्या प्रशिक्षणासाठी द्याव्यात म्हणून आपण पालिका अधिकाऱ्यांशी बोललो. निविदा प्रक्रिया पूर्ण करून या खेळपट्ट्यांचे वाटप केले जाईल असे सांगण्यात आले. आता त्या ठिकाणी खासगी प्रशिक्षण संस्थेने कसा काय प्रशिक्षणाचा फलक लावला. हा इतर प्रशिक्षण संस्थांवर अन्याय आहे.**
>
> **- राजन धोत्रे, बॉइज क्रिकेट क्लब, डोंबिवली.**

# अंबरनाथमधील शेतकऱ्यांना भातशेतीतील नाविन्यपूर्ण उपक्रमातून आर्थिक फायदा



**किंमत जास्त, तरी मागणी अधिक**

**काळा, निळा, लाल तांदूळ आरोग्यासाठी उपकारक असून अँटीऑक्सिडेंट गुणधर्मामुळे मधुमेहावर गुणकारी असल्याचे बोलले जाते. ईशान्य भारतातील राज्यांतून येणाऱ्या या भाताची किंमत जास्त असली तरी ग्राहकांची त्याला मागणी आहे. बाजारात या भाताचा प्रतिकिलो दर 100 ते 300 रुपयांपर्यंत आहे.**

**बदलापूर :** मजुरी आणि उत्पादन खर्च वाढल्याने भातशेती परवडत नाही अशी ओरड करणाऱ्या शेतकऱ्यांना अंबरनाथ तालुक्यातील शेतकऱ्यांनी भातशेतीतील नाविन्यपूर्ण उपक्रमातून चोख उत्तर दिले आहे. तालुक्यात कृषी विभागाच्या मदतीने यंदा वैशिष्ट्यपूर्ण अशा काळा, लाल आणि निळ्या भाताची लागवड केली.

गेल्या चार महिन्यांत विविध अस्मानी संकटांतही या भात पिकाने तग धरला आणि सध्या हे पीक काढणीला आले आहे. अंबरनाथ तालुक्यातील औषधी गुणधर्म असलेला काळा, लाल आणि निळा भात बाजारात येणार आहे. त्यातून पारंपरिक भात पिकापेक्षा नक्कीच अधिकचे उत्पन्न शेतकऱ्यांना मिळणार आहे. ठाणे जिल्ह्यातील लागवडीखालील 66 हजार हेक्टर क्षेत्रापैकी 54,500 हेक्टर क्षेत्रावर भात पिकाची लागवड केली जाते. भात शेतीसाठी लागणारे महागडे मजूर आणि उत्पादन खर्च वाढल्याने ही शेती परवडत नसल्याची ओरड शेतकरी करतात. राज्याच्या कृषी विभागाने शेतकऱ्यांच्या या समस्येवर तोडगा काढण्यासाठी गेल्या वर्षी काळ्या भाताचे बियाणे तयार करण्यासाठी हालचाली सुरु केल्या होत्या. लागवडीसाठी बिजोत्पादन प्रक्रिया उन्हाळ्यात पूर्ण करून 2021च्या खरीप हंगामात काळ्या भाताचे बियाणे शेतकऱ्यांना देण्यात आले. त्यासोबतच लाल आणि निळ्या भाताचे बियाणेही शेतकऱ्यांना देण्यात आले.

यंदाच्या मोसमात सुरुवातीला पावसाने ओढ दिली. जुलैच्या पावसाने भाताला तारले. ऑक्टोबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात भाताचे पीक काढणीला आले असताना परतीच्या पावसाने शेतकऱ्यांसमोर नवे संकट उभे केले होते. त्यातूनही जिल्ह्यात भाताने तग धरला आहे. त्यामुळे यंदा अंबरनाथ तालुक्यात काळा, लाल आणि निळ्या भाताचे उत्पादन शेतकऱ्यांना मिळणार आहे. या तीन रंगांच्या भात वाणाचे उत्पादन कमी असले तरी त्यामुळे इतर शेतकऱ्यांना प्रोत्साहन मिळण्यास मदत होणार असल्याची माहिती अंबरनाथचे कृषी सहायक सचिन तोरवे यांनी दिली आहे. कृषी विभाग भात विक्रीसाठीही सहकार्य करणार असून त्याची तयारी सुरु असल्याचेही तोरवे यांनी सांगितले आहे.

DAILY THANEVAIBHAV RNI REGD NO. 27878/ 75, POSTAL NO. THC/186/2018-2021
कल्याण-डोंबिवली, नवी मुंबई, मीरा-भाईंदर, अंबरनाथ-बदलापूर, भिवंडी, उल्हासनगर, मुरबाड, शहापूर.

ठाणेवैभव
अधिक बातम्यांसाठी आमच्या
वेबसाइटला भेट द्या
www.thanevaibhav.in

www.thanevaibhav.in

# ठाणेवैभव

ठाणे जिल्ह्याचे सर्वाधिक खपाचे परिपूर्ण दैनिक | इष्ट ते छापणार | संस्थापक : नरेन्द्र बल्लाळ




मीरा-भाईंदर वैभव विशेष
➤➤पान ५ वर

भारतीय सौर दिनांक कार्तिक ३० शके १९४४ | वर्ष ४७ | अंक ५६ | शुक्रवार २२ ऑक्टोबर २०२१ | पाने ८ | रु. ४
संपादक : मिलिन्द बल्लाळ

## ठाण्यात ३५ गृह प्रकल्पांचा मार्ग मोकळा

# फ्लेमिंगो क्षेत्राची सीमा घटली; गृह प्रकल्पांचे आभाळ वाढले

**ठाणे: फ्लेमिंगो अभयारण्याची परिसरातील संवेदनशील मर्यादा 10 किलोमीटरवरुन कमी करुन 3.89 किलोमीटरवर आणल्याने ठाणे पूर्व भागातील 35 गृहप्रकल्पांचा मार्ग मोकळा झाला आहे. यामुळे ठाणे महापालिकेच्या तिजोरीत 400 कोटींची भर पडण्याची शक्यता आहे.**



केंद्र सरकारच्या एका जुन्या आदेशाचा दाखला देत राज्य सरकारच्या कांदळवन विभागाने राष्ट्रीय उद्यान तसेच अभयारण्य क्षेत्राच्या सीमेपासून 10 किलोमीटर अंतरापर्यंत कोणतेही बांधकाम करता येणार नाही असे आदेश काढले होते. डिसेंबर 2018 रोजी सर्वोच्च न्यायालयाच्या एका आदेशानुसार अभयारण्य क्षेत्राची अंतिम अधिसूचना जाहीर करावी, असे निर्देश केंद्र सरकारला देण्यात आले. तोपर्यंत बांधकामांना परवानगी देऊ नये, असेही स्पष्ट करण्यात आले. एप्रिल 2019 मध्ये राज्याच्या कांदळवन विभागाने नवे निर्देश काढत फ्लेमिंगो अभयारण्य संवेदनशील क्षेत्रात शासकीय अथवा विकासकांच्या प्रकल्पांना परवानगी हवी असेल तर त्यासाठी राज्य वन्य जीव मंडळ तसेच राष्ट्रीय वन्य जीव मंडळाच्या स्थायी समितीची पूर्वपरवानगी घेण्याची अट टाकण्यात आली. अशी परवानगी घेतली नाही तर तो सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या आदेशाचा भंग ठरेल असेही नमूद करण्यात आले. त्यामुळे अनेक गृहप्रकल्पांना यामुळे अडसर झाला होता.

फ्लेमिंगो अभयारण्य संवेदनशील क्षेत्रात ठाण्यातील ठाणे पूर्वपासून घोडबंदरच्या सुरज वॉटर पार्कपर्यंतचा परिसर मोडतो. त्यातही कोपरीचा काही भागच यात जात असून त्या ठिकाणी कोणत्याही स्वरुपाचे बांधकाम झालेले नाही. परंतु असे असले तरी या निर्णयामुळे थेट 10

➤➤पान ४ वर

## ठाण्यात कोरोनाचे ३२ नवे रुग्ण

**ठाणे:** शहरातील नवीन कोरोना रुग्णांची संख्या तळाला गेली आहे. अवघे 32 रुग्ण सापडले आहेत. 61जण कोरोनामुक्त झाले असून एका रुग्णाचा मृत्यू झाला आहे.

महापालिका क्षेत्रातील कोरोना रुग्ण वाढ कमी झाली आहे. अवघा एक टक्का रुग्ण आज मिळाले आहेत तर दुप्पट रुग्ण बरे झाले आहेत.

आत्तापर्यंत एक लाख 37 हजार 831 रुग्ण ठणठणीत बरे होऊन घरी गेले आहेत तर रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आलेल्या रुग्णांची संख्या पुन्हा एकदा 600च्या आत आली आहे. 573जणांवर उपचार सुरु आहेत. एक रुग्ण दगावला असून आत्तापर्यंत दोन हजार 95जणांचा मृत्यू झाला आहे.

महापालिका प्रशासनाने काल शहरातील तीन हजार 380 नागरिकांची चाचणी घेतली होती. त्यामध्ये 32जण बाधित मिळाले आहेत. आत्तापर्यंत 20 लाख 39 हजार 333 ठाणेकरांची चाचणी घेण्यात आली होती. त्यामध्ये एक लाख 40 हजार 499जण बाधित सापडले आहेत.

## फेरीवाल्याचा पालिकेच्या पथकावर प्राणघातक हल्ल्याचा प्रयत्न

**पातलीपाड्यात कासारवडवलीची पुनरावृत्ती?**

**ठाणे:** कासारवडवली येथे सहाय्यक आयुक्त कल्पिता पिंपळे यांच्यावर झालेल्या हल्ल्यानंतर फेरीवाल्यांची दहशत आणखी वाढल्याचे दिसत आहे. पातलीपाड्यात कारवाईसाठी गेलेल्या पालिकेच्या पथकावर पुन्हा एकदा चाकूने हल्ला करण्याचा प्रयत्न झाला असल्याचा धक्कादायक प्रकार उघड झाला आहे.

माजिवडे-मानपाडा प्रभाग समितीच्या अंतर्गत येत असलेल्या पातलीपाडा परिसरातील शरणम सोसायटीजवळ तीन दिवसांपूर्वी हा प्रकार घडला आहे.

➤➤पान ४ वर




## कामाचे मूल्यमापन न करताच ३१ कोटींचे बिल अदा

**ठाणे:** ठाणे महापालिकेच्या डीजी ठाणे या डिजिटल प्लॅटफॉर्मचे व्यवस्थापन करणाऱ्या कंपनीला संगणक विभागाच्या आक्षेपानंतर त्यांच्या कामाचे मूल्यमापन न करताच 31 कोटींचे बिल अदा करण्यात आल्याचे उघडकीस आले आहे. आता केवळ उरलेले सव्वा कोटींचे बिल थांबवण्याचा निर्णय ठाणे महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत घेण्यात आला आहे.

**डीजी ठाणे प्रकल्प सुरु झाल्यानंतर पहिल्या सहा महिन्यातच पाच लाखांचे उद्दीष्ट गाठावे असे निश्चित करण्यात आले होते. ठाणे शहराची लोकसंख्या 25 लाखांच्या आसपास असताना आतापर्यंत केवळ दोन लाख नागरिकांनी हा ॲप डाउनलोड केला आहे.**

देशातील पहिला डिजिटल प्रकल्प अर्थात डीजी ठाणे या प्रकल्पाचे उदघाटन 23 जानेवारी 2018 रोजी पालिकेच्या डॉ. काशिनाथ घाणेकर नाट्यगृहात मोठ्या दिमाखात करण्यात आले. डीजी ठाणेच्या माध्यमातून करभरणा, शॉपिंग, विविध प्रकारची बिले अदा करणे अशा

➤➤पान ४ वर

## बंद पडलेल्या गाड्यांसाठी पोलिसांचा पर्यायी डिझेल पंप

**डिझेलअभावी गाड्या बंद पडून होते घोडबंदर रस्त्यावर वाहतूक कोंडी**

**ठाणे:** गेल्या दीड महिन्यात घोडबंदर मार्गावर तब्बल 76 अवजड वाहने भररस्त्यावर बंद पडण्याचे प्रकार घडले आहेत. यामुळे या पट्ट्यात अनेकवेळा मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होते. या वाहनांसाठी वाहतुक पोलिसांनी डिझेल भरलेले कॅन उपलब्ध करून ठेवले आहेत. बंद पडलेली वाहने वेळीच मार्गी लागावीत हा हेतू या मागे असल्याचे वाहतूक शाखेकडून कळते.

घोडबंदर रोडच्या गायमुख जकात नाक्यावर आणि आजूबाजूच्या परिसरात अपघातांची जणू मालिकाच सुरु आहे. यामध्ये प्रामुख्याने अवजड वाहने उलटण्याच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. त्यातच ठाण्यातून गुजरातकडे येणाऱ्या आणि जाणाऱ्या अवजड वाहनांमध्ये डिझेल संपल्याने तीही बंद पडत असल्याने आणखीच वाहतूक कोंडीत भर पडत आहे. कधी कधी एका दिवसाला पाच ते सहा वाहने बंद पडत असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

ही बाब लक्षात येताच वाहतूक पोलिसांनी डोके चालवून या परिसरात 25 ते 50 लीटरचे डिझेलचे भरलेल्या कॅनची व्यवस्था करून

➤➤पान ४ वर

# अवघ्या १२ तासांत अपहृत बालकाची सुटका




**ठाणे:** अवघ्या 12 तासात अपहरण करण्यात आलेल्या तीन वर्षांच्या मुलाची कळवा पोलिसांनी सुटका करून आई-वडिलांच्या ताब्यात दिले आहे


खारीगाव येथील राखी बनवण्याचा व्यवसाय करणारे भरत पटवा यांच्या तीन वर्षांच्या ओम या मुलाचे 20 ऑक्टोबर रोजी दुपारी 3.45च्या दरम्यान कोणीतरी अपहरण केल्याची तक्रार कळवा पोलीस ठाण्यात केली होती. या गुन्ह्याबाबत कोणत्याही प्रकारचा पुरावा नव्हता. पोलिसांनी खारीगाव परिसरातील इमारतीच्या आवारातील सीसीटीव्ही कॅमेरे तपासले असता एक महिला रिक्षामधून ओम याला घेऊन जात असल्याचे फुटेजमध्ये दिसले. पोलिसांनी रिक्षा मालकाची माहिती घेतली असता ती रिक्षा नूरजहाँ शेख (25) यांची असल्याचे समजले. ही रिक्षाचालक महिला बनेल गाव टिटवाळा येथे राहत असल्याची माहिती मिळाली.

पोलिसांनी क्षणाचा विलंब न करता त्या महिलेला ताब्यात घेतले. चौकशीत तिने ओमचे अपहरण केल्याची कबुली दिली. पोलिसांनी ओम याला तिच्या घरातून ताब्यात

➤➤पान ४ वर




## विनाभाडे होत आहे पालिकेच्या वास्तूंचा वापर



**ठाणे:** ठाणे महापालिकेने भाडेतत्वाने दिलेल्या वास्तुंचे भाडेच वसुल केले जात नसल्याची बाब बुधवारी झालेल्या महासभेत समोर आली आहे. अशा वास्तुंबाबत काय धोरण आखले जाणार आहे, याची माहिती द्यावी असे आदेश महापौरांनी प्रशासनाला दिले आहेत.

बुधवारी झालेल्या महासभेत कोपरीतील आरोग्य केंद्र भाडे स्वरुपात देण्याचा प्रस्ताव मंजुरीसाठी पटलावर ठेवण्यात आला होता. त्याच अनुषंगाने नजीब मुल्ला यांनी प्रशासनाला धारेवर धरले. यापूर्वी अशा स्वरुपाच्या किती वास्तु भाड्याने देण्यात आल्या आहेत, किती वास्तुंचे भाडे थकीत आहे, कितीची वसुली झाली, थकीत असलेल्या भाडेधारकांवर काय कारवाई करण्यात आली याची माहिती त्यांनी मागितली. भाडेवसुलीची प्रक्रिया सुरु असल्याची माहिती प्रशासनाच्या वतीने देण्यात आली. मात्र किती भाडे वसुल झाले, दंडात्मक काय कारवाई केली याची माहिती प्रशासनाला देता आली नाही. त्यामुळे अशा किती वास्तु ताब्यात घेण्यात आल्या, असा सवालही सदस्यांनी उपस्थित केला. विशेष म्हणजे अशा स्वरुपातील वास्तु अनेकांनी वाढीव भाडे घेऊन इतरांना चालविण्यासाठी दिल्याची बाबही समोर आली.

दरम्यान या प्रकरणाची चौकशी करण्यात यावी असे आदेश महापौर म्हस्के यांनी दिले. तसेच, काही वास्तु या झोपडपट्टीत आहेत, त्यामुळे त्यांच्याकडून जास्तीच्या भाड[illegible]ाची अपेक्षा करणे अयोग्य असल्याचेही त्यांनी सांगितले. त्यासाठी आता नव्या स्वरुपात पुन्हा भाडे आकारण्याचा प्रस्ताव प्रशासनाने पुढे आणावा असे आदेशही त्यांनी दिले.



# प्रभागातील प्रलंबित कामांसाठी रामबाग रहिवाशांचे साखळी उपोषण



**कल्याण :** कल्याण-डोंबिवली महानगरपालिका परिसरातील प्रभाग क्रमांक 27 मधील विविध मागण्या घेत वारंवार पालिकेला तक्रारी करून पालिका प्रशासन लक्ष देत नसल्याने तिरंगा जागृती विचार मंच व स्थानिक महिला व पुरुष वर्गाने पालिकेच्या विरोधात साखळी उपोषण सुरु केले आहे.

प्रभाग क्रमांक 27मधील एव्हरेस्ट नगर सोसायटीमधील पावसाच्या पाण्याचा निचरा, चिकणघर गावठाण मधील महापालिकेच्या काँक्रीट रस्त्यावर रबरी पद्धतीचे गतिरोधक (स्पिडब्रेकर) बसविणे, अंबिका सोसायटीमागील महापालिकेची बंदिस्त गटार साफ करणे, बी. जे. पार्क बिल्डींग ते कनकावती बिल्डींगपर्यंत पाणी वाहून नेणारे मातीने भरलेले पाईप काढून या ठिकाणी भुयारी गटारी बांधणे, श्रमसाफल्य चाळ ते सज्जनवाडीपर्यंत होणाऱ्या काँक्रीट रस्त्यामधून अमृत योजने अंतर्गत ड्रेनेज लाईन टाकणे, एव्हरेस्टर नगर, सम्राट नगर, हिनापार्क बिल्डींग येथील गटार नव्याने बांधून बंदिस्त करणे, अशा प्रकारच्या 12 विविध मागणीसाठी अनेक वर्षापासून पत्रव्यवहार करूनही महानगरपालिका लक्ष देत नसल्याने महानगरपालिकेचे लक्ष वेधण्यासाठी व परिसरातील काम लवकर करून घेण्यासाठी तिरंगा जागृती विचार मंचचे अध्यक्ष चेतन म्हामुणकर व स्थानिक महिला व पुरुष वर्गाने पालिकेच्या विरोधात कल्याण रामबाग येथील जीवनसंध्या सोसायटी परिसरात रस्त्यावर बसून साखळी उपोषण सुरु केले आहे. पालिका प्रशासन जोपर्यंत जागे होत नाही तोपर्यंत हे साखळी उपोषण सुरु राहणार असल्याचे चेतन म्हामुणकर यांनी सांगितले.

# औद्योगिक विभागातील नागरिक समस्यांनी गांजले

## दक्ष नागरिक करणार २४ ऑक्टोबरला आंदोलन

**डोंबिवली :** कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील औद्योगिक विभागातील नागरिक गेली अनेक वर्षे खड्डेमय रस्ते, अनियमित-अनियंत्रित पाणी पुरवठा, प्रलंबित मलनिस्सारण रचना, विजेचा लपंडाव आणि स्वच्छता या समस्यांनी त्रस्त आहेत. याकडे महापालिका, एमआयडीसी व वीज वितरण कंपनीचे प्रशासन दुर्लक्ष करीत आहे. परिणामी याचा त्रास करदाते नागरिकांना होत आहे. यामुळे अखेर कंटाळून औद्योगिक विभागातील नागरिकांनी रविवार दिनांक 24 ऑक्टोबर रोजी आंदोलनाचा इशारा दिला आहे.



डोंबिवली औद्योगिक विभागातील निवासी विभाग दक्ष नागरिक मंचच्या समूहाने या भागात राहणाऱ्या अनेक नागरिकांसोबत चर्चा करून या परिस्थितीबाबत संबंधित प्रशासकीय यंत्रणांना जाब विचारण्यासाठी आंदोलनाची भूमिका घेण्याचा निर्णय घेतला आहे. या भागातील नागरिक रविवार 24 ऑक्टोबर 2021 रोजी मूक आंदोलन करणार असून, कोव्हिडच्या पार्श्वभूमीवर हे आंदोलन करताना कोणतीही गर्दी होणार नाही याची काळजी घेण्यात येणार आहे. त्यापद्धतीने सूचना नागरिकांना वेळोवेळी देण्यात येत आहेत. सर्व नागरिक रस्त्याच्या दुतर्फा दहा दहा फुटाच्या अंतरावर निषेध फलक घेऊन उभे राहतील अशी रचना करण्यात आली आहे. सदर आंदोलनासाठी डोंबिवली औद्योगिक निवासी विभाग दक्ष नागरिक मंचच्या वतीने पुढाकार घेण्यात आला असून हा मंच पूर्णतः अराजकीय असून, सकारात्मक दृष्टिकोन ठेऊन दबावगट म्हणून काम करणाऱ्या नागरिकांचा समूह असल्याची माहिती दक्ष नागरिक मंच औद्योगिक परिसरचे विजय मेटकर, अतुल रायकर, वैभव जोशी,अतुल मोडक यांनी दिली.

विशेष म्हणजे दर महिन्यात 2 ते 3 वेळा सदर भागाला पाणीपुरवठा करणाऱ्या मुख्य जलवाहिन्या फुटतात आणि त्यामुळे त्यानंतर तीन ते चार दिवस कमी दाबाने आणि अपुरा पाणीपुरवठा होत असल्याचा येथील नागरिकांचा अनुभव आहे. खड्डेमय रस्ते ही समस्या तर पूर्ण डोंबिवलीची असून इथल्या नागरिकांनी गेले अनेक वर्षे याबाबत आवाज उठवला आहे. अनेक वेळा रस्त्यांसाठी निधी मिळाल्याच्या बातम्या नागरिकांपर्यंत येतात पण याबाबतची जबाबदारी एकमेकांवर ढकलण्यात येतो.



# पोलीस स्मृती दिनानिमित्त पालकमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले अभिवादन

**ठाणे:** पोलीस स्मृती दिनानिमित्त ठाणे पोलीस आयुक्तालयातर्फे आयोजित अभिवादन कार्यक्रमात जिल्ह्याचे पालकमंत्री एकनाथ शिंदे यांनी शहीद पोलीस अधिकारी- कर्मचारी यांना श्रद्धांजली अर्पण केली.

वर्षभरात कर्तव्य बजावताना वीरमरण आलेल्या देशातील 377 शहीद पोलिसांच्या स्मृतींना यावेळी वंदन करण्यात आले. शहीद पोलिसांच्या बलिदानाची आठवण म्हणून उभारण्यात आलेल्या येथील स्मृतीस्तंभाला पालकमंत्री श्री. शिंदे यांनी यावेळी अभिवादन केले तसेच शहिद पोलिसांच्या कुटूंबियांची भेट घेऊन त्यांची विचारपूस करीत दिलासा दिला.

यावेळी ठाणे पोलीस आयुक्त जयजीत सिंग, ठाण्याचे अतिरिक्त पोलीस आयुक्त सुरेश मेखला, ठाणे ग्रामीण पोलीस अधीक्षक विक्रम देशमाने, ठाणे वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त बाळासाहेब पाटील आणि ठाणे पोलीस आयुक्तालयातील सर्व प्रमुख पोलीस अधिकारी आणि जवान उपस्थित होते.

# दुकानातून साड्या व ड्रेस मटेरियल चोरणाऱ्या महिला सीसीटीव्हीत कैद

**डोंबिवली :** कल्याण-शिळ मार्गावरील सुचकनाक्यावर असलेल्या एका कापडाच्या दुकानात ग्राहक बनून आलेल्या चार महिला आणि एक पुरुषाने दुकानदारांची नजर चुकवून 18 हजार रुपये किंमतीच्या साड्या आणि ड्रेस मटेरियल चोरल्याचा धक्कादायक प्रकार सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला आहे.

टाटा पॉवर अर्थात सुचकनाका परिसरामध्ये निशा वाघ यांच्या मालकीचे मैत्रीण बुटीक नावाचे साडी आणि ड्रेस मटेरियलचे दुकान आहे. या दुकानात बुधवारी सायंकाळी सातच्या सुमारास चार महिला आणि एक पुरुष ग्राहक बनून आले. दुकानात काम करणाऱ्या महिला कपडे दाखविण्यात असताना चोरट्या महिला दुकानातील लेडीज ड्रेस मटेरियल आणि साड्या असा सुमारे 18 हजार रुपये किमतीचा मुद्देमाल घेऊन पळून गेल्या. ही बाब दुकानातील कामगार पुन्हा माल लावत असताना लक्षात आले. त्यानंतर त्यांनी सीसीटीव्ही फुटेज पाहिले असता, ग्राहक म्हणून आलेल्या त्या चार महिला आणि एक पुरुष दुकानातील कुर्ती आणि साड्या चोरीत असल्याचे दिसून आले.

दुकानाच्या मालकीन निशा वाघ यांनी मानपाडा पोलीस ठाण्यात जाऊन तक्रार दाखल केली. याच दरम्यान अशाच प्रकारे त्या मार्गावर आणखीन दोन-चार दुकानात चोरी झाल्याचे उघड झाले असून पोलीस सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे या साडीचोरी करणाऱ्या टोळीचा शोध घेत आहेत.

# खोणी गावातील कॉम्प्लेक्समध्ये साडेचार लाखांची घरफोडी

**डोंबिवली:** खोणी गावठाण हद्दीतील आलिशान कॉम्प्लेक्समध्ये घुसून चोरट्यांनी तब्बल चार लाख 49 हजारांचे सोन्याचे दागिने चोरुन नेले. सुरक्षा रक्षकांचा कडेकोट बंदोबस्त असतानाही या कॉम्प्लेक्समध्ये इतकी मोठी घरफोडी झाली कशी, असा सवाल या निमित्ताने व्यक्त करण्यात येत आहे.

या संदर्भात या सोसायटीच्या सी विंगमध्ये राहणारे अंकेत झा (27) यांनी मानपाडा पोलीस ठाण्यात जाऊन तशी तक्रार दाखल केली आहे. झा कुटुंबीय 9 ऑक्टोबर रोजी नवरात्रौत्सवानिमित्ताने मध्यप्रदेशातील ग्वाल्हेरला मूळगावी गेले होते. हे कुटुंब 20ऑक्टोबर रोजी सकाळी 11 वाजता घरी परतले तेव्हा घरातील सामान अस्ताव्यस्त पडलेले आढळून आले. तर बेडरूममध्ये जाऊन बघितले असता लाकडी कपाटासह त्याचे लॉकर उघडे दिसले. तसेच शौचालयाच्या खिडकीची लोखंडी ग्रील कापलेली दिसली. चोरट्यांनी या घरातून मंगळसूत्र, अंगठ्या, हार, ब्रेसलेट, मोबाईलसह चेकवर स्वाक्षऱ्या केलेले बुकदेखील चोरुन नेल्याचे अंकेत झा यांनी त्यांच्या तक्रारीत म्हटले आहे. पोलिस या प्रकरणी अधिक तपास करत आहेत.

# आरोग्य सेवेच्या क्षेत्रात रोटरीचे योगदान महत्त्वाचे: डॉ. भारती पवार

**मुंबई:** कोरोनाविरोधी मोहिमेअंतर्गत आम्ही आतापर्यंत देशभरातील तब्बल 100 कोटी लोकांचे लसीकरण केले असून त्यापैकी 30 लाख लसीकरणाचे श्रेय एकट्या रोटरीला आहे आणि हे कार्य केवळ त्याच्या अतिशय महत्वाच्या मदतीमुळेच शक्य झाले ', रोटरी डिस्ट्रीक्ट क्रमांक 3141 च्या वतीने सहारा स्टार या पंचतारांकित हॉटेलांच्या सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या सोहळ्यामध्ये असे गौरवोद्गार केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री डॉ.भारती पवार यांनी काढले.



रोटरी हिरोस पुरस्कार वितरणाच्या सदर कार्यक्रमात डॉ. पवार ह्या प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होत्या. आंतरराष्ट्रीय पातळीवर कार्यरत असलेल्या संघटनेने आरोग्य क्षेत्रामध्ये केलेल्या मोलाच्या कामगिरीचे त्यांनी मुक्तकंठाने कौतुक केले. कोरोनाकाळात पिडितांचे उपचारांपासून ते मुंबईहून स्थलांतरित होणाऱ्या इतर राज्यातील मजुर, गोरगरिब-निराधार-गरजूंची मदत आणि बचावाची व्यवस्था करून अनेकांना अन्न, औषध, इतर आवश्यक वस्तू देऊन मदत करणाऱ्या अनेक रोटरीयन्सना याप्रसंगी डॉ. भारती पवार यांच्या हस्ते रोटरी हिरोस पुरस्काराने गौरविण्यात आले.

कार्यक्रमात रोटरीच्या राष्ट्रीय कोविड प्रोग्रॅमचे चेअरमन अशोक महाजन आणि वोक्हार्ट हॉस्पिटलचे चेअरमन हबीब खोराकीवाला हेही विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते.

कार्यक्रमात रोटरी डिस्ट्रीक्ट क्रमांक 3141 चे गव्हर्नर डॉ.राजेंद्र अग्रवाल यांच्या कार्याचे कौतुक करताना डॉ.भारती पवार म्हणाल्या की, त्यांच्या नेतृत्वाखाली संस्थेच्या या युनिटने आरोग्यसेवा क्षेत्रात अतुलनीय काम केले आहे. आतापर्यंत तीन हजार लहान मुला-मुलींची हृदयाची शस्त्रक्रिया त्याच्या माध्यमातून करण्यात आली आहेत. कर्करोगग्रस्तांच्या उपचार आणि कॉक्यूलर इम्प्लांट्समध्येही त्यांनी उत्कृष्ट कामगिरी केली आहे. तसेच मधुमेह तपासणी शिबिर आयोजित करून एका दिवसात एक दशलक्ष लोकांना लाभ देण्याचे श्रेयही रोटरी इंडियाकडे आहे. डॉ.राजेंद्र अग्रवाल यांच्या या सर्व कर्तृत्वाचे अत्यंत अभिमानास्पद वर्णन करून त्यांनी त्यांना इतर सक्षम व्यक्ती आणि समाजातील संघटनांसाठी प्रेरणादायी असल्याचे याप्रसंगी सांगितले.

# मिरा-भाईंदर मनपा वार्ताहर संघाच्या अध्यक्षपदी राजू काळे यांची निवड

मीरारोड: मीरा-भाईंदर महापालिका वार्ताहर संघाच्या अध्यक्षपदी पुढारीचे वरीष्ठ पत्रकार राजू काळे यांची पुन्हा निवड करण्यात आली असून यापूर्वी त्यांनी सलग अडीच वर्षे संघाच्या अध्यक्षपदाची जबाबदारी यशस्वीपणे सांभाळली होती. यंदा 2021-22 करीता संघाच्या वरीष्ठांनी पुन्हा त्यांची अध्यक्षपदावर वर्णी लावल्याने संघाशी एकनिष्ठ असलेल्या सदस्यांनी समाधान व्यक्त केले आहे.

उपाध्यक्ष पदावर वृत्तमानसचे अनिल खेडेकर, सचिवपदी दोपहर का सामनाचे चंद्रकांत दुबे, सहसचिवपदी महाराष्ट्र टाईम्सचे भाविक पाटील, खजिनदार पदी पुण्यनगरीचे नामदेव काशीद, सदस्यपदी खबरे आजतकचे व्यासकुमार रावल, सामनाचे फोटोग्राफर सचिन लाडे, उर्दू टाईम्सचे अझीम तांबोळी, जनकल्याण सेवाच्या सीमा गुप्ता, कार्यालय प्रमुखपदी सुरजप्रकाश सांडेसर यांची निवड करण्यात आली आहे. संघाचे मार्गदर्शक म्हणून संस्थापक राजेंद्र कांबळे, दूरदर्शनचे मिलिंद लिमये तर सल्लागार म्हणून फ्रि प्रेस जर्नलचे सुरेश गोलानी, सकाळचे प्रकाश लिमये हे कार्यरत राहणार आहेत.



# वाचन मंदिर भिवंडीतर्फे वाचन प्रेरणा दिन साजरा

**भिवंडी:** वाचन हा आपल्या अभ्यासाचा व सवयीचा भाग असायला हवा. वाचनाने विद्यार्थी अधिक कृतिशील व विचाराने प्रगल्भ होतो. अभ्यासाव्यतिरिक्त काहीतरी अवांतर वाचन हा एक आपल्या सवयीचा भाग असायला हवा असे उद्गार प.रा.विद्यालयाच्या शिक्षिका प्राजक्ता कुलकर्णी यांनी काढले.

भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम जयंतीचे औचित्य साधून वाचन मंदिरतर्फे भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव म्हणजेच 75 व्या वर्षात आंतरशालेय निबंध व चित्रकला स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेचा बक्षीस समारंभ प्राजक्ता कुलकर्णी यांच्या हस्ते करण्यात आला. त्यावेळी त्या विद्यार्थी वर्गाला मार्गदर्शन करताना कुलकर्णी बोलत होत्या. यावेळी व्यासपीठावर संस्थेचे अध्यक्ष सुधीर सिंगासने, कार्यवाह किशोर नागवेकर, खजिनदार उज्ज्वल कुंभार, कला शिक्षक संतोष बळीराम भोईर इत्यादी उपस्थित होते.

डॉ. ए.पी.जे.अब्दुल कलाम यांची जयंती वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरी केली जाते. भारतीय भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवनिमित्त शालेय विद्यार्थ्यांकरता आंतर निबंध व चित्रकला स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेचा बक्षीस समारंभ नुकताच पार पडला. सदर स्पर्धेत विविध शाळांमधून 91 निबंध व 81 देशभक्तीपर चित्रे प्राप्त झाली. त्याचा बक्षीस समारंभ डॉ. ए.पी.जे.अब्दुल कलाम जयंतीच्या निमित्ताने शारदीय प्रबोधन माला आयोजित करण्यात येते या उपक्रमात वाचन प्रेरणा दिनाचे आयोजन देखील केले होते.

कार्यक्रमाची सुरवात सरस्वती पूजनाने करण्यात आली. निंबध स्पर्धांचे परीक्षक म्हणून प्राजक्ता कुलकर्णी तर संतोष भोईर यांनी चित्रकला स्पर्धा परीक्षण करून विद्यार्थी वर्गाला मार्गदर्शन केले. यावेळी विज्ञान विषयावर आधारित पुस्तकांचे प्रदर्शन देखील आयोजित केले होते. याला देखील विद्यार्थी वर्गाने चांगला आनंद घेतला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कार्यकारणी सदस्य योगेश वल्लाल, प्रसाद पुण्यार्थी, अंजली घुगरे, राधा जोशी, ग्रंथपाल सुजाता वडके, प्रणाली खोडे, शलका मदन यांनी विशेष मेहनत घेतली, शेवटी कार्यवाह किशोर नागावेकर यांनी सर्व उपस्थित यांचं आभार मानले.

# ठाण्यात महावितरणचे ३० मीटर जळून खाक

**ठाणे:** ठाणे पूर्वेतील कोपरी येथील श्री गुरुदेव सोसायटीतील महावितरणच्या मीटर बॉक्सला गुरुवारी सकाळी साडेअकरा वाजण्याच्या सुमारास आग लागली. या आगीत सोसायटीमधील 30 मीटर बॉक्स जळून खाक झाले. यामध्ये कोणतीही जीवितहानी झाली नसल्याची माहिती सूत्रांनी दिली.

ही इमारत कोपरीतील मंगला हायस्कूलच्या बाजूला, दत्त मंदिराजवळ असून ती इमारती तळ अधिक चार मजली आहे. तळ मजल्यावर मीटर बॉक्स रुम असून त्याला सकाळच्या सुमारास आग लागली. या आगीत महावितरणाचे 30 बॉक्स जळून खाक झाले. या घटनेची माहिती मिळताच ठाणे महापालिकेच्या प्रादेशिक आपत्ती व्यवस्थापन विभागासह अग्निशमन दल आणि महावितरणाच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. ही आग शॉट सर्किटमुळेच लागल्याची शक्यता वर्तवली जात आहे.

# संजय पाटील यांचे निधन



भिवंडी: शंकर मंदिर, चाविंद्रा दांडेकर वाडी भिवंडी येथ संजय पाटील यांचे कोरोना महामारीमुळे 10 एप्रिल 2021 रोजी वेद हॉस्पिटल भिवंडी येथे निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले आहेत.

पान ३ वरुन

## फ्लेमिंगो क्षेत्राची सीमा घटली; गृह प्रकल्पांचे आभाळ वाढले

किमीच्या भागाला फटका बसला होता. त्यामुळे 2018 पासून सुरु झालेल्या या पट्ट्यातील तब्बल 35हून अधिक प्रकल्पांना याचा फटका बसल्याचे दिसून आले होते. या नियमाचा अडसर विकासकांना जसा झाला तसाच, ठाणे महापालिकेला देखील बसल्याचे दिसून आले होते. परंतु आता केंद्राने यातील अडसर दूर केल्याने या रखडलेल्या किंवा नव्या प्रकल्पांना चालना मिळणार असून पालिकेच्या उत्पन्नातही 400 कोटींहून जास्त निधीची भर पडणार असल्याचे बोलले जात आहे.

## फेरीवाल्याचा पालिकेच्या पथकावर प्राणघातक हल्ल्याचा प्रयत्न

विशेष म्हणजे या परिसरापासून पालिका आयुक्तांचा बंगला अगदी हाकेच्या अंतरावर आहे. याच परिसरात पालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या वतीने फेरीवाल्यांवर नियमित कारवाई सुरु होती. या पथकामध्ये 10 ते 11 जणांचा समावेश होता. यावेळी कडधान्य विकणाऱ्या फेरीवाल्यावर कारवाई करायला सरसावलेल्या चार कंत्राटी कामगारांवर संबंधित कडधान्य विक्री करणाऱ्या फेरीवाल्याने चाकू उगारला. यावेळी हे चारही कामगार या फेरीवाल्यावर धावून गेल्यावर काही नागरिकांनी त्याला चाकू खाली ठेवायला सांगितल्यावर त्याने चाकू खाली ठेवला. विशेष म्हणजे या फेरिवाल्याने यावेळी जीवे मारण्याची धमकी देखील दिली असल्याची माहिती पालिकेच्या सूत्रांनी दिली आहे. फेरीवाल्यांच्या अशा दहशतीमुळे पथकातील कर्मचारी आणि कामगार देखील घाबरल्याने हा प्रकार लवकर उघड झाला नाही. दरम्यान या प्रकाराला प्रशासनाच्या वतीने देखील दुजोरा देण्यात आला असून संबंधित फेरीवाल्यावर पोलीस ठाण्यात तक्रार करण्यात येणार असल्याचे प्रशासनाच्या वतीने स्पष्ट करण्यात आले आहे.

फेरीवाल्यांवरील कारवाईला पोलीस बळ मिळत नसल्याने फेरीवाल्यांची हिंमत देखील वाढली आहे. केवळ मोठी कारवाई असेल तरच पोलीस बंदोबस्त घेण्यात येतो. मात्र नियमित कारवाईला पोलीस बंदोबस्त दिला जात नसल्याने फेरीवाले देखील या कारवाईला जुमानत नसल्याचे उघड झाले आहे.

घडलेला हा प्रकार अतिशय गंभीर असून प्रशासनाच्या वतीने देखील या संपूर्ण प्रकरणाची गंभीर दखल घेतली आहे. संबंधित फेरीवाल्याच्या विरोधात पोलीस ठाण्यात तक्रार देण्याच्या सूचना सहाय्यक आयुक्तांना देण्यात आल्या आहेत. प्रशासनाच्या वतीने या सर्व प्रकारावर कडक आणि तात्काळ कारवाई केली जाईल, असे अतिक्रमण विभागाच्या उपायुक्त अश्विनी वाघमळे यांनी सांगितले.

## बंद पडलेल्या गाड्यांसाठी पोलिसांचा पर्यायी डिझेल पंप

ठेवली आहे. तसेच गुजरातकडे येणाऱ्या आणि जाणाऱ्यांना वाहनांमध्ये पुरेसे डिझेल भरण्याबाबत सूचनाही केलेल्या असल्याची माहिती वाहतूक पोलीस सूत्रांनी दिली आहे. डिझेल वाहनात भरल्यावर तातडीने ते वाहन निघून गेल्यावर वाढणारी कोंडी कमी होणार आहे. मात्र हे डिझेल देताना, संबंधित चालकांकडून पेट्रोलपंपावरील दराप्रमाणे पैसे आकारलेही जात आहे. तसेच ठाण्यातून जाताना- येताना वाहनधारकांनी वाहनांमध्ये पुरेसे इंधन आहे की नाही याची खात्री करून वाहन रस्त्यावर आणावे असे आवाहन ही वाहतूक पोलिसांनी केले आहे.

डिझेल चोरीच्या घटनांमुळे वाहनचालकांकडून कमी प्रमाणात डिझेल भरले जात आहे. परिणामी भर रस्त्यात वाहन बंद पडून वाहतूक कोंडीत आणखी भर पडत आहे. याशिवाय काही वाहनांमध्ये केवळ चालकच असल्याने डिझेल आणण्यासाठी त्याला गाडी सोडूनच जावे लागते. यासाठीच 25 ते 50 लीटरचे डिझेलचे भरलेल्या कॅनची व्यवस्था करण्यात आल्याचे बाळासाहेब पाटील, पोलीस उपायुक्त, वाहतुक शाखा,ठाणे शहर यांनी सांगितले.

## अवघ्या १२ तासांत अपहृत बालकाची सुटका

घेतले आणि आई-वडीलांकडे सुपूर्द केले.

ही कारवाई कळवा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मनोहर आव्हाड, पोलीस निरीक्षक सुदेश आजगावकर, गुन्हे प्रकटीकरण विभागाचे पोलीस उप निरीक्षक एम. बी. कवळे, एम. पी. महाजन, पोलीस हवालदार श्री. शिंदे, श्री. शेजवळ, पोलीस नाईक महाडिक आणि माळी यांच्या पथकाने केली आहे.

## कामाचे मूल्यमापन न करताच ३१ कोटींचे बिल अदा

सुविधा ठाणेकरांना देण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले होते. यामध्ये विशेष करून व्यापारी वर्गाचा देखील यामध्ये समावेष करण्याचा उद्देश ठेवण्यात आला होता. तर या ऍपच्या माध्यमातून मालमत्ता कर भरल्यास करसवलत देण्याचेही जाहीर करण्यात आले होते. अशा अनेक सुविधांची घोषणा या माध्यमातून करण्यात आली असली तरी मालमत्ता आणि पाणीपट्टी पलिकडे बहुतांश सेवा देण्यास संबंधित कंपनी सुरुवातीचे काही दिवस वगळता अयशस्वीच ठरली आहे. या कंपनीसोबत करण्यात आलेला करार हा ऑगस्ट 2020 रोजी संपुष्टात आला असून कोरोनाच्या काळात या कंपनीला मुदतवाढ देणे शक्य झालेले नाही.

या ऍपच्या माध्यमातून 2.80 लाख ठाणेकरांनी नोंदणी केली होती. परंतु त्याचा वापर किती जणांनी आतापर्यंत केला याची माहिती उपलब्ध होऊ शकलेली नाही. तर यामध्ये सुमारे 550 व्यापाऱ्यांनी सहभाग घेतला होता. सुरवातीला काही योजनांचा फायदा व्यापाऱ्यांना दिला. त्या अनुषंगाने संबंधित एजन्सीला सुरवातीला 11 कोटींचे बिले अदा करण्यात आले. त्यानंतर दुसरे बिल 6.30 कोटींचे मंजुरीसाठी आणण्यात आले. परंतु त्याचवेळी या योजनेचा लाभ किती जणांनी घेतला, व्यापाऱ्यांचा किती सहभाग होता, किती नागरिकांनी व्यापाऱ्यांकडून या फ्लॅटफॉर्मच्या माध्यमातून योजनांचा फायदा झाला, अशा काही शंका उपस्थित करण्यात आल्या होत्या.

याच कारणामुळे संबंधित अधिकाऱ्यांनी या बिलावर स्वाक्षरी करण्यास नकार दिला होता. त्यासाठी त्याच्यावर दबाव आणण्यास सुरवात झाली. त्यानंतर तो ऐकत नसल्याने त्याला दोन वेळा वैद्यकीय रजेवर पाठविण्यात आले. त्यानंतर हजर होण्याआधीच दुसऱ्या अधिकाऱ्याने त्या बिलावर स्वाक्षरी करुन बिल काढले होते. असा हा प्रकार घडला होता असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

आता या डिजी ठाण्याचे जवळ जवळ 31 कोटींचे बील अदा करण्यात आले असून अवघे 1.25 कोटींचे बिल देणे शिल्लक आहे. हे बील थांबविण्याचे आदेश महापौर नरेश म्हस्के यांनी ठाणे महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत दिले आहेत. त्यानुसार या प्रकरणाची चौकशी लावण्यात आली असून यासंदर्भातील अहवाल सादर करण्याचेही सांगण्यात आले आहे.

# कै. कांती कोळी यांच्या आठवणींना शोकसभेत उजाळा

**ठाणे:** काँग्रेसपक्षाचे ज्येष्ठ नेते माजी आमदार कै. कांती कोळी यांचे 14 ऑक्टोबर 2021 रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्या निमित्ताने त्यांच्या आठवणींना व त्यांच्या राजकीय सामाजिक कार्याला उजाळा देण्यासाठी काँग्रेस परिवार, अखिल भारतीय कोळी समाज, समस्त ठाणेकर नागरिक यांच्यावतीने काल 19 ऑक्टोबर रोजी ठाणे जिल्हा कोळी समाज येथे शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते.



या शोकसभेमध्ये माजी आमदार कै. कांती कोळी यांचे चिरंजीव मंगेश कोळी व परेश कोळी यांनी व त्यांचे कुटुंबातील पुतणे जगदिश कोळी, जयेंद्र कोळी, हेमेंद्र कोळी, जावई महेश किणी यांनी दिप प्रज्वलित करुन तसेच कै. कांती कोळी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. तद्नंतर काँग्रेसपक्षाचे ज्येष्ठ नेते माजी आमदार कै. कांती कोळी यांच्या राजकिय व सामाजिक कार्याबद्दल महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष सुभाष कानडे म्हणाले की, कांती कोळी यांच्या निधनामुळे काँग्रेस पक्षाची मोठी हानी झाली आहे. भारतीय जनता पार्टीचे आमदार निरंजन डावखरे यांनी कै.कांती कोळी यांच्या राजकिय व सामाजिक कार्याचा गौरव केला. नवी मुंबईचे शिवसेना व कोळी समाजाचे नेते नामदेव भगत म्हणाले की कोळी समाजाचा आधारस्तंभ गेला. देशातील सर्वात पहिली कोळी समाजाची इमारत ठाणे येथे उभी केली. तसेच कार्ला येथे कोळी समाज बांधवासांठी विश्रामगृह बांधले. कोळी समाज बांधवांच्या जातीचे दाखले व इतर समस्येबाबत सातत्याने पाठपुरावा केला.

प्रदेश काँग्रेसचे सचिव मनोज शिंदे, ठाणे काँग्रेसचे अध्यक्ष विक्रांत चव्हाण , माजी उप-महापौर शरद कोळी, नंदकुमार मोरे यांनीही भावना व्यक्त केल्या.

या शोकसभेस अखिल भारतीय कोळी समाज महाराष्ट्र महिला अध्यक्ष पुष्पा मढवी, ठाणे शहर जिल्हा महिला काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षा शिल्पा सोनोने, कोळी समाजाचे नेते व भाजपाचे मच्छिमार सेलचे अध्यक्ष चेतन पाटील, ठाणे शहर मनसे अध्यक्ष रविंद्र मोरे, ठाणे काँग्रेसचे माजी अध्यक्ष अनिल साळवी, माजी नगरसेवक सुभाष कोळी, युनायटेड स्पोर्ट क्लबचे अध्यक्ष विजय नाखवा, काँग्रेस नेते जे.बी. यादव, महागिरी कोळीवाडा विभागाचे अध्यक्ष हरेश्वर कोळी, कोळी समाजाचे युवा अध्यक्ष वासुदेव पाटील, ठाणे शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस संकठा पाठक, ठाणे शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस रमेश इंदिसे, काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते, कोळी समाजाचे पदाधिकारी व कार्यकर्ते, ठाणेकर नागरिक व इतर समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून भावपूर्ण श्रध्दांजली वाहिली.

'ठाणेवैभव' हे दैनिक मालक-मुद्रक-प्रकाशक मिलिन्द बल्लाळ यांनी मिड-डे इन्फोमिडिया लि., R/847/3, टी.टी.सी. इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी रबाळे, नवी मुंबई-४००७०१. महाराष्ट्र येथे छापून दामले अपार्टमेंट, टेंभीनाका, ठाणे (प) महाराष्ट्र -४००६०१ येथे प्रकाशित केले.
दूरध्वनी नं. २५३४१५२६,२५३४८५९४ Email : thanevaibhav1975@gmail.com

# मीरा-भाईंदर वैभव



**आम्हा घरी धन | शब्दांचीच रत्ने | शब्दांचीच शस्त्रे | यत्ने करु ||**

## फार्स संपणार ?

अनधिकृत बांधकामांना पुढाऱ्यांचा अभय असतो. सत्तेवर असो वा नसो, पुढाऱ्यांचा आशिर्वादाशिवाय अनधिकृत बांधकामे होत नसतात हे देशातील कोणत्याही शहरातील शेंबडे पोरही सांगेल. त्यामुळे अशा बांधकामांविरूद्ध कारवाई कायम फार्स ठरत आली आहे. आता मात्र परिस्थिती बदलेल असे आशादायक चित्र मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी घेतलेल्या भूमिकेवरून दिसते. दबावाखाली न येता युद्धपातळीवर कारवाई करण्याचे आदेशच त्यांनी मुंबई महापालिकेला दिले आहेत.

श्री. ठाकरे यांच्या आदेशामुळे कायद्याचे पालन करणारे नागरीक खुश होतील. अर्थात ही घोषणा आगामी महापालिका निवडणुकांवर डोळा ठेऊन केली नसल्याचा प्रत्यय मुख्यमयंत्र्यांना द्यावा लागेल. शहराचे बकालीकरण थांबवले पाहिजे आणि त्यासाठी नियोजनबद्ध विकास व्हायला हवा, असे मुख्यमंत्र्यांना वाटत असले तरी सर्वच राजकीय पक्षांचे आर्थिक हीतसंबंध त्यांची घोषणा प्रत्यक्षात आणण्यात अडथळा निर्माण करू शकते.

मुख्यमंत्र्यांनी मनात आणले तर ते मुंबईचे चित्र बदलू शकतील, त्यांच्याकडे संशयाने पहाण्याऐवजी विरोधी पक्षांनी स्वागत करायला पाहिजे आणि प्रत्यक्ष कारवाईची योजना जाणून व्हायला हवी, तसे करण्यातच शहाणपणा आहे. अन्यथा मुख्यमंत्र्यांच्या दिलासादायक घोषणेचे राजकारण व्हायला वेळ लागणार नाही. एकदा का राजकारण शिरले की ही घोषणा हवेत विरून जायला वेळ लागणार नाही.

भाजपाच्या नेत्यांनी श्री. ठाकरे यांच्या घोषणेची थट्टा केली आहे. माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यापूर्वीच मुख्यमंत्र्यांवर भाबडेपणाचे ‘नाटक’ करीत असल्याचा आरोप केला आहे. श्री. ठाकरे यांच्या निकटवर्तीयांचे बेकायदा बांधकामात हात गुंतले असताना त्यांची घोषणा कागदावरच राहील असेही विरोधकांचे म्हणणे आहे. हे कितीही खरे मानले तरी एक संधी द्यायला काय हरकत आहे. राजकारण करण्यासाठी आणखी बरेच विषय आहेत. काही बाबतीत तरी राजकारण दूर ठेवायलाच हवे. भाजपा नेत्यांनी श्री. ठाकरे यांच्या कारवाईचा लेखाजोखा ठेवावा. तसे ते करीत नसतील तर तेच या कारवाईत खो घालत आहेत असा गैरसमज पसरू शकतो.

सध्या राजकारणात भ्रष्टाचारावरून सत्ताधारी आणि विरोधी पक्षात कलगीतुरा रंगला आहे. एकाने दुसऱ्याची लक्तरे वेशीवर टांगली की दुसऱ्याने आरोप करणाऱ्यांचे तोंड बंद करण्यासाठी जुनी मढं उकरण्याचा प्रकार सुरू आहे. त्यामुळे मंडळी खरोखरीच भ्रष्टाचार आणि बेकायदा बांधकामांविरूद्ध आहेत की जनतेच्या डोळ्या धूळ फेकण्याचा प्रयत्न पुढारीमंडळी करीत आहेत? बघुया मुख्यमंत्र्यांच्या घोषणेनंतर मुंबई महापालिका किती युद्धपातळीवर कामाला लागते ते!

## भीषण पाणी टंचाईवरून मीरा-भाईंदरात राजकारण पेटले

**| भाजपचे मटकाफोड आंदोलन | बैठकीतून शिवसेना-काँग्रेसच्या नगरसेवकांचा काढता पाय**



भाईंदर : मीरा-भाईंदर शहराला भेडसावणाऱ्या ज्वलंत पाणी समस्येविरोधात भाजपाने आज अक्षरश: रणकंदन माजविले. माजी आमदार नरेंद्र मेहता आणि महापौर ज्योत्स्ना हसनाळे यांच्या नेतृत्वाखाली प्रारंभी रस्त्यावर उतरलेल्या भाजपाने नंतर मोर्चा वळवत मीरा-भाईंदर मुख्य कार्यालयात मटकाफोड आंदोलन केले. यानंतर आयुक्त दिलीप ढोले यांनी बोलविलेल्या सर्वपक्षिय नेत्यांच्या बैठकीला भाजपाने जोरदार आक्षेप घेताच शिवसेना आणि काँग्रेसच्या नगरसेवकांना बैठकीतून काढता पाय घ्यावा लागला.

मीरा-भाईंदर शहराला महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून 135 दशलक्ष लिटर तर स्टेम प्राधिकरणाकडून 86 दशलक्ष लिटर्स इतका पाणीपुरवठा मंजूर आहे. प्रत्यक्षात मात्र गेल्या सहा महिन्यापासून या महामंडळाकडून प्रति दिन साधारणत: 85 दशलक्ष लिटर तर स्टेम प्राधिकरणाकडून 60 ते 70 दशलक्ष लिटर पाणीपुरवठा केला जात आहे. त्यामुळे या शहरात कृत्रिम पाणीटंचाई निर्माण झालेली आहे.

या भीषण पाणी टंचाईच्या निषेधार्थ सर्वच राजकीय पक्ष रस्त्यावर उतरले आहेत. आज माजी आमदार नरेंद्र मेहता आणि महापौर ज्योत्स्ना हसनाळे यांच्या नेतृत्वाखाली मीरारोड सिल्व्हर पार्क येथून जलआंदोलन सुरू करण्यात आले. या आंदोलनात उपमहापौर हसमुख गहलोत, सभागृह नेते प्रशांत दळवी, भाजपा नगरसेवक आणि शेकडो कार्यकर्ते सहभागी झाले होते. यावेळी कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला होता. हा मोर्चा तद्नंतर एमआयडीसीच्या अंधेरी येथील मुख्यालयाच्या दिशेने निघणार होता. मात्र एमआयडीसीचे मुख्य अभियंता आणि स्टेम प्राधिकरणाचे व्यवस्थापकीय अधिकारी महानगरपालिकेत दाखल झाले होते. त्यामुळे भाजपाच्या मोर्चेकऱ्यांनादेखील महापालिकेत पाचारण करण्यात आले. या ठिकाणी महापौर दालनाबाहेर भाजपाच्या नगरसेवक तथा पदाधिकाऱ्यांनी ठिय्या आंदोलन केले आणि पाणी टंचाईच्या निषेधार्थ मटकेही फोडले.

यानंतर आयुक्त दिलीप ढोले यांनी पाणी टंचाईसंदर्भात सर्वपक्षिय नेत्यांची एक बैठक आयोजित केली होती. मात्र भाजपाने या बैठकीला जोरदार आक्षेप घेतला. भाजपाचा मोर्चा आलेला असताना अन्य राजकीय पक्षांना आमंत्रित करून आयुक्त ढोले यांनी राजकीय वाद निर्माण करण्याचा प्रयत्न केला असल्याचा आरोप नरेंद्र मेहता यांनी केला. त्यामुळे या बैठकीत जोरदार वादंग झाला असता भाजपाच्या पदाधिकाऱ्यांनी महाआघाडी सरकारच्या विरोधात जोरदार घोषणायुद्ध सुरु केले. त्यामुळे या बैठकीतून शिवसेना आणि काँग्रेसच्या नगरसेवकांना काढता पाय घ्यावा लागला.

मीरा-भाईंदर शहराला एमआयडीसीकडून 135 दशलक्ष लिटर्स मंजूर पाणी पुरवठ्याचा कोटा दैनंदिन मिळायलाच हवा, अशी मागणी नरेंद्र मेहता यांनी केली असता सद्यस्थितीत ही मागणी मान्य करता येणार नाही. जुन्या जलवाहिन्या बदलण्याकरीता या महामंडळाकडून 140 कोटी रूपयाचे टेंडर काढण्यात आलेले आहे. काम पूर्ण होण्यास दीड वर्षाचा कालावधी लागणार असल्याचे या महामंडळाच्या मुख्य अभियंत्यांनी सांगितले. तर मीरा-भाईंदरला स्टेम प्राधिकरणाकडून मिळणाऱ्या पाण्याची ठाणे महापालिका हद्दीत चोरी होत असून ही चोरी तत्काळ रोखण्यात यावी, अशी मागणी मेहता यांनी केली.

## सहा प्रभाग समित्यांवर भाजपचेच वर्चस्व

**दोन प्रभागांत बिनविरोध सभापती**



**भाईंदर: मीरा-भाईंदर महापालिकेच्या सहा प्रभाग समितींतील सभापती पदावर भाजपच्या सर्व उमेदवारांचा बहुमताने विजय झाला. तर प्रभाग समिती क्रमांक 2 व 5 मधील सभापतीची निवडणूक बिनविरोध झाल्याने त्यावर भाजपचे अनुक्रमे पंकज उर्फ दरोगा पांडे व अनिल विराणी हे विजयी ठरले.**

प्रभाग समिती सभापतींची मुदत संपुष्टात 31 मार्च रोजी संपुष्टात आल्यानंतर त्या पदावरील निवडणुका कोविड संक्रमणामुळे पुढे ढकलण्यात आल्या होत्या. अखेर त्या 20 ऑक्टोबर रोजी पिठासीन अधिकारी म्हणूना मुंबई उपनगर जिल्हाधिकारी निधी चौधरी यांच्या नियंत्रणाखाली ऑनलाईन पद्धतीने पार पडल्या. सभापती पदासाठी प्रभाग समिती 1 साठी भाजपकडून नयना म्हात्रे व सेनेकडून शर्मिला बगाजी यांनी उमेदवारी अर्ज भरला होता. त्यात म्हात्रे यांना 6 तर शर्मिला यांना 4 मते मिळाली. यावेळी भाजपचे विनोद म्हात्रे गिरनार येथे गेल्याने ते नॉट रिचेबल झाल्याचे पक्षाच्या सुत्राकडून सांगण्यात आले. तर प्रभाग समिती 2 साठी भाजपचे पंकज उर्फ दरोगा पांडे यांनी एकमेव उमेदवारी अर्ज भरल्याने त्यांची निवड बिनविरोध झाल्याचे पिठासीन अधिकाऱ्यांनी जाहिर केले.

प्रभाग समिती 3 साठी भाजपकडून गणेश शेट्टी व सेनेकडून वंदना विकास पाटील यांनी उमेदवारी अर्ज भरला होता. त्यात शेट्टी यांना 11 तर सेनेला 9 मते मिळाल्याने शेट्टी यांचा 2 मतांनी विजय झाला. प्रभाग समिती 4 साठी भाजपकडून डॉ. प्रिती पाटील व सेनेकडून स्नेहा पांडे यांनी उमेदवारी अर्ज भरला होता. त्यात डॉ. प्रिती पाटील यांना 12 तर पांडे यांना सेनेसह काँग्रेसची 7 मते मिळाली. यात डॉ. प्रिती पाटील यांचा 5 मतांनी विजय झाला. प्रभाग समिती 5 साठी भाजपकडून अनिल विराणी यांनी एकमेव उमेदवारी अर्ज भरल्याने त्यांची निवड बिनविरोध झाल्याचे जाहिर करण्यात आले. प्रभाग समिती 6 साठी भाजपकडून मोहन म्हात्रे व काँग्रेसकडून अनिल सावंत यांनी उमेदवारी अर्ज भरले होते. त्यात म्हात्रे यांना 12 व सावंत यांना काँग्रेससह सेनेची 7 मते मिळाल्याने म्हात्रे यांना 5 मतांनी विजय झाला. यावेळी सेनेचे कमलेश भोईर अनुपस्थित राहिले होते.

## सफाई कामगारांनी मालकी हक्काच्या घरांसाठी फोडला टाहो

**भाईंदर: राज्य शासनाच्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य योजनेंतर्गत पालिकेत 25 वर्षांहून अधिक सेवा झालेल्या स्थायी सफाई कामगारांना मोफत घरे योजनेंतर्गत मीरा-भाईंदर महापालिकेने अद्याप 69 सफाई कामगारांना 15 ऑगस्ट 2015 रोजी मोफत सदनिका दिल्या. मात्र गेल्या सहा वर्षांपासून सदनिकाधारक कामगारांच्या नावे त्या सदनिका अद्याप झाल्या नसल्यामुळे या कामगारांनी या मालकी हक्कांच्या घरांसाठी टाहो फोडला आहे.**

मीरा-भाईंदर महापालिकेने 2015 मध्ये मीरारोड येथील सुविधा भूखंड अंतर्गत मेसर्स युनिक शांती डेव्हलपर्स या विकासकाने बांधून दिलेल्या इमारतीतील सदनिका पालिकेत 25 वर्षे सेवा झालेल्या 69 स्थायी सफाई कामगारांसह त्यांच्या वारसांना मोफत दिल्या आहेत. मात्र या सदनिकांत वास्तव्य करणाऱ्या कामगारांना सदनिकांचा कायमस्वरुपी मालकी हक्क अद्याप पालिकेकडून देण्यात आलेला नाही. त्यासाठी 17 ऑगस्ट 2019 रोजी महासभा आयोजित करण्यात आली होती. त्यात सत्ताधारी भाजपने सदनिका वाटपात गैरव्यवहार झाल्याचा आरोप करीत त्याच्या चौकशीसाठी महापौरांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्याचा ठराव मंजुर करण्यात आला. त्यात पालिकेचे निवृत्त अधिकारी संजय गोखले व विजय पाटील या दोन सेवा निवृत्त अधिकाऱ्यांसह उपमहापौर हसमुख गेहलोत, नगरसेवक सुरेश खंडेलवाल, दिनेश जैन, शिवसेना व काँग्रेसचे प्रत्येकी एक नगरसेवक, शहर अभियंता शिवाजी बारकुंड यांचा समावेश करण्यात आला. तर समितीतील त्या दोन सेवा निवृत्त अधिकाऱ्यांना चौकशीकरीता नियुक्त करण्यात आले.

या अधिकाऱ्यांनी पाच महिन्यांपुर्वीच पालिकेकडे चौकशी अहवाल सुपूर्द केला असता त्यातील शिफारशींची अंमलबजावणी मात्र प्रशासनाकडून अद्याप करण्यात आलेली नाही. दरम्यान महापौर ज्योत्स्ना हसनाळे यांनी 15 जुलै रोजी आयोजित केलेल्या आढावा बैठकीत प्राप्त 70 सदनिकांपैकी 69 सदनिका पात्र कामगारांना वाटप करण्यात आल्याच्या मुद्यावर चर्चा करण्यात आली. त्यात काही कामगारांची नावे दोनदा नोंद करण्यात आल्याने ते दोन सदनिकांचे लाभार्थी ठरल्याचा मुद्दा उपस्थित करण्यात आला. तर एकाच कुटूंबातील दोन कामगारांची नावे नोंद करण्यात आल्यासह काही कामगारांनी मिळालेल्या सदनिका भाडेतत्वावर दिल्याचे समोर आले. त्याची चौकशी करुन दुबार नोंद झालेल्या कामगारांची एक सदनिका तसेच एकाच कुटूंबातील दुसऱ्या कामगाराची सदनिका व भाडेतत्वावर देण्यात आलेल्या सदनिकांची चौकशी करुन त्या काढून घेण्यात याव्यात. त्या सदनिका गरजू कामगारांना देण्यात याव्यात, असे निर्देश महापौरांनी प्रशासनाला दिले.

या इमारतीच्या देखभाल दुरुस्तीसाठी सदनिकाधारकांकडून निधी जमा होत नसल्याने त्यात असुविधा निर्माण झाल्याच्या मुद्यावर देखील चर्चा करण्यात आली. त्यावर कोणतीही कार्यवाही न झाल्याने महापौरांनी गेल्याच आठवड्यात पुन्हा बैठक आयोजित करुन त्यात ज्या अधिकाऱ्यांनी सदनिका वाटपात प्राधान्य क्रमवारीत चूक करुन काही कर्मचाऱ्यांना वाटप करण्यात आलेल्या सदनिकांवर चूकीचा आक्षेप घेतला आहे. अशा अधिकाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी. तसेच पात्र असलेल्या 26 कामगारांना देखील तातडीने सदनिका देऊन इमारतीच्या जागेच्या कागदपत्रांची पुर्तता करावी. त्यातील सदनिका, सदनिकाधारक कामगारांच्या नावे कायमस्वरुपी करण्यात याव्यात, असे निर्देश प्रशासनाला दिले. मात्र प्रशासनाने त्यावर अद्याप कोणतीही कार्यवाही न केलेली नाही.

## नगरसेवक विनोद म्हात्रे यांचे नगरसेवक पद धोक्यात

**भाईंदर : मीरा-भाईंदर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती पदाच्या निवडणूकीत अघोषित बहिष्कार टाकणारे भाजपाचे नगरसेवक विनोद म्हात्रे यांचे नगरसेवक पद आता धोक्यात आले आहे. यामुळे भाजपा गोटात एकच खळबळ माजली आहे.**

मीरा-भाईंदर महानगरपालिकेच्या सहा प्रभागांसाठी 20 ऑक्टोबर रोजी घेण्यात आली होती. या निवडणूकीत भाजपाच्या वतीने प्रभाग क्र. 1 मधून भाजपा नगरसेविका नयना म्हात्रे यांना अधिकृत उमेदवार जाहिर करण्यात आले होते. निवडणूकीचा उमेदवारी अर्ज दाखल करताना नयना म्हात्रे यांच्यासमवेत स्वत: विनोद म्हात्रे जातीने हजर होते. परंतु ऑनलाईन मतदानाच्या वेळी विनोद म्हात्रे यांनी मतदानात सहभाग घेतला नव्हता. नगरसेवक विनोद म्हात्रे गैरहजर राहिल्या प्रकरणाची भाजपाचे गटनेते हसमुख गहलोत यांनी गंभीर दखल घेतली. त्यानुसार आज गेहलोत यांनी पक्षाचा व्हिप डावलल्याप्रकरणी नगरसेवक विनोद म्हात्रे यांना नोटीस बजाविलेली आहे.

म्हात्रे यांनी येत्या 24 तासांत याबाबतचा स्पष्ट खुलासा करण्यात यावा, अन्यथा त्यांच्याविरोधात कार्यवाही करण्यात येईल, अशा आशयाची आज नोटीस बजावलेली आहे.

## शिवसेनेचे पाणी टंचाईविरोधात घागर फोडो आंदोलन




**भाईंदर : ऐन दिवाळीच्या तोंडावर मीरा-भाईंदर शहरात निर्माण झालेल्या कृत्रिम भीषण पाणी टंचाईच्या विरोधात शिवसेनेने घागर फोडो आंदोलन छेडले असल्याने पालिका प्रशासनाचे धाबे चांगलेच दणाणले आहेत.**

मीरा-भाईंदर शहराला स्टेम व एमआयडीसीकडून अनुक्रमे 86 व 135 असा एकुण 221 एमएलडी पाणी पुरवठा मंजूर असताना गेल्या काही दिवसांपासून सरासरी 150 एमएलडीच पाणीपुरवठा होत आहे. यामुळे झपाट्याने विकास होत असलेल्या या शहरात पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाल्याने ऐन सणासुदीच्या दिवसांत लोकांना पाण्यापासून वंचित रहावे लागत आहे. या पाणी टंचाईला पालिकेसह सत्ताधारी भाजप जबाबदार असल्याचा आरोप करीत शिवसेनेने प्रभाग समिती कार्यालय क्रमांक 3 व 4 बाहेर घागर फोडो आंदोलन छेडले.

यावेळी आंदोलकांनी पालिकेतील सत्ताधारी भाजपसह पालिका प्रशासनाविरोधात जोरदार घोषणाबाजी करुन शहरात उद्भवलेल्या कृत्रिम पाणी टंचाईचा निषेध व्यक्त केला. 2011 मध्ये शहरातील पाणी टंचाई सुसह्य करण्यासाठी पालिकेने नवीन नळजोडण्या देण्यास बंदी घातली. यानंतर 2017 मध्ये पालिकेतील सत्ताधारी पक्षाने ती बंदी उठवून मागेल त्याला नळजोडण्या देण्यास सुरुवात केली. वाटेल त्याला व वाटेल तशा प्रमाणात नवीन नळजोडण्या देण्यात आल्याने त्यात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार होऊन मूळ रहिवाशांना पाण्याची टंचाई जाणवू लागली आहे.


सत्ताधारी पक्षाच्या स्थानिक नेत्याने आपल्या मर्जीतील विकासकांच्या नवीन बांधकामांना बेकायदेशीरपणे नळजोडण्या देऊन सामान्य लोकांच्या वाट्याचे पाणी त्या बांधकामांकडे वळविल्याचा आरोप आंदोलकांकडून करण्यात आला. तसेच काही अवैध बांधकामांसह अनधिकृत बार, लॉजिंग-बोर्डींगलासुद्धा अनधिकृत नळजोडण्या देण्यात आल्याने मूळ रहिवाशांना मिळणारे पाणी कमी होऊन शहरातील जुन्या नागरी वस्त्यांत पाण्याची कृत्रिम टंचाई निर्माण होऊ लागली आहे. अशातच शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या जलवाहिन्या सतत फुटत असल्याने शहराचा पाणीपुरवठा खंडित होतो. तर जलवाहिन्या दुरुस्तीच्या नावाखाली सुद्धा शहराचा पाणीपुरवठा खंडित केला जात असल्याने शहरातील पाण्याची समस्या जटील होऊ लागली आहे. पाण्याच्या समस्येला पालिकेसह सत्ताधारी पक्षच जबाबदार असल्याने शहरात पाण्याची कृत्रिम टंचाई निर्माण होत असल्याने पालिकेने तात्काळ अनधिकृतपणे देण्यात आलेल्या नळजोडण्या खंडित करुन नवीन बांधकामांना नळजोडण्या देऊ नयेत, अशी मागणी सेनेकडून करण्यात आली आहे.

शहरात उद्भवलेल्या या कृत्रिम पाणीटंचाई सेनेने विरोधात प्रभाग समिती कार्यालय क्रमांक 3 व 4 बाहेर घागर फोडो आंदोलन छेडले. शहरातील पाण्याची समस्या त्वरीत निकाली न काढल्यास हे आंदोलन पुढेही सुरुच राहणार असल्याचा इशारा आंदोलकांकडून यावेळी देण्यात आला. आंदोलनात सेनेचे उपजिल्हाप्रमुख शंकर विरकर, महिला उपजिल्हासंघटक निलम ढवण, निशा नार्वेकर, उपशहरप्रमुख प्रकाश मोरे, प्रवक्ता शैलेश पांडे, नगरसेवक दिनेश नलावडे, जयंतीलाल पाटील, नगरसेविका तारा घरत, स्नेहा पांडे, युवा सचिव सचिन मांजरेकर आदींनी सहभाग घेतला होता.

## भुयारी गटार योजनेंचे तीन तेरा वाजणार ?







भाईंदर : मीरा-भाईंदर महापालिकेने शहरातील प्रमुख भागांत राबविलेल्या भुयारी गटार योजनेंतर्गत सुरु केलेल्या मलनि:स्सारण केंद्रात (एसटीपी - सिव्हरेज ट्रिटमेंट प्लांट) सांडपाण्यावरील पुनर्प्रक्रीया ठप्प असल्याची बाब समोर आल्याने पालिकेने सांडपाण्यावर पुनर्प्रक्रीया करुन त्या पाण्याचा वापर पिण्याव्यतिरीक्त करण्याचा केलेला दावा सपशेल फोल ठरल्याचे निदर्शनास आले आहे.

पालिकेने 2009 मध्ये भुयारी गटार योजनेचे कंत्राट सुभाष प्रोजेक्टस् अ‍ॅन्ड मार्केटिंग लि. या कंपनीला दिले. सुमारे 491 कोटींच्या या योजनेच्या कामाला 2010 मध्ये सुरुवात करण्यात आली. या योजनेत शहरातील सुमारे 60 टक्के शहरी भागाचा समावेश करण्यात आला असुन उर्वरीत 40 टक्के भागाचा अद्याप या योजनेपासून वंचित ठेवण्यात आला आहे. तरीदेखील पालिकेकडून शहरातील मालमत्ताधारकांकडून मलप्रवाह लाभ कराची सरसकट वसूली केली जात आहे. या योजनेंतर्गत मुख्य मलवाहिनी अंथरुन 13 एसटीपी (मलनि:स्सारण केंद्र) केंद्र उभारण्याच्या खर्चासह ही योजना सुमारे 550 कोटींवर गेली आहे. मात्र पालिकेने 13 पैकी 10 एसटीपी केंद्रेच अद्यापपर्यंत निश्चित केली आहेत. पालिकेने 10 पैकी मीरारोडच्या शांतीनगर सेक्टर 5, शांतीपार्क, हाटकेश, कनाकिया, भाईंदर पुर्वेकडील स्पोर्टस् कॉम्प्लेक्सच्या मागे व भाईंदर पश्चिमेकडील कस्तुरी गार्डन परिसरातील 6 केंद्रच कार्यान्वित केले असुन उर्वरीत 4 केंद्रांपैकी भाईंदर पुर्वेकडील नवघर, मीरारोड येथील नयानगर व सृष्टी येथील केंद्राचे बांधकाम अर्धवटच केले आहे.

भाईंदर पश्चिमेकडील मुख्यालयामागे नियोजित असलेल्या केंद्राच्या बांधकामाला अद्याप सुरुवात केलेली नाही. पालिकेने जी एसटीपी केंद्रे सुरु केली आहेत त्यातील सृष्टी येथील एसटीपी केंद्रामधील सांडपाण्यावर पुनर्प्रक्रिया न करता ते थेट केंद्रालगत असलेल्या नाल्यात सोडले जात असुन तेच पाणी शहरातील झाडेझुडपांना घालण्यासाठी टँकरमध्ये देखील भरले जात आहे. हिच परिस्थिती सुरु असलेल्या इतर केंद्रांची आहे. या केंद्रांच्या देखभालीसाठी पालिकेने विविध कंपन्यांना ठेका दिला असुन काही केंद्रांत तर सुरक्षा रक्षकांकडूनच केंद्र सुरु किंवा बंद केले जात असल्याचे निदर्शनास आले आहे. यामुळे केंद्रांतील बहुतांशी साहित्यासह बांधकाम जीर्णावस्थेत गेले असुन त्यात कोट्यावधींचा निधी वाया गेल्याचे दिसून आले आहे.

यापुर्वी भाईंदर पुर्वेकडील जेसलपार्क लोकवस्तीसाठी सुरु करण्यात आलेले एसटीपी केंद्र देखील बंद असुन त्यात पंपाद्वारे सांडपाणी खेचून पुन्हा तसेच लगतच्या खाडीत सोडले जाते. पालिकेने एसटीपी केंद्रांतील सांडपाण्यावर पुनर्प्रक्रीया करुन ते पिण्याव्यतिरक्त इतर वापरासाठी उपलब्ध करुन देण्याचा निर्णय 2012 मध्ये घेतला होता. त्यावेळी सुरुवातीला प्रक्रीया केलेले सुमारे 10 एमएलडी पाणी मागेल त्याला मोफत पुरवठा करण्यात येणार असल्याचे पालिकेकडून जाहिर करण्यात आले होते. कालांतराने हे प्रमाण 5 एमएलडीवर आले. मात्र त्यातील एकही थेंब अद्याप उपलब्ध झालेला नाही. सांडपाण्यावर प्रक्रीया करणारी यंत्रणाच गेल्या अनेक वर्षांपासून बंद असल्याने पालिकेने जाहिर केलेला सांडपाण्यावरील प्रक्रीयेचा दावा सपशेल फोल ठरल्याचे निदर्शनास आले आहे. या केंद्रांतील सांडपाण्यावर पुनर्प्रक्रिया करुन त्याच्या शुद्धतेचे प्रमाण तपासण्यासाठी पालिकेने सृष्टी येथील केंद्रात टेस्टिंग लॅब सुरु केली. ती लॅबसुद्धा बंद असल्याचे निदर्शनास आले असतानाही पाणी तपासल्याच्या बोगस नोंदी रजिस्टरमध्ये केल्या जात असल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे.

# कोरोना लसीकरणात भारताने गाठला 100 कोटींचा टप्पा

नवी दिल्ली : करोना महामारीविरुद्धच्या युद्धात देश एक मोठी कामगिरी साध्य केलीआहे. भारतातील लसीकरणाचा आकडा आज 100 कोटी टप्पा पार केला आहे आणि या निमित्ताने देशभरात साजरा करण्याची तयारी केली जात आहे. आतापर्यंत जगात फक्त चीनने 100 कोटींहून अधिक लसीकरण केले आहे. आतापर्यंत, 18 वर्षांवरील 75 टक्के लोकांना लसीचा पहिला डोस देण्यात आला आहे. तर 31 टक्क्यांहून अधिक लोकांचे पूर्णपणे लसीकरण करण्यात आले आहे. देशात 18 ते 44 वयोगटातील 55,29,44,021, 45 ते 59 वयोगटातील 26,87,65,110 आणि 60 वर्षांवरील 16,98,24,308 लोकांचे देशात लसीकरण करण्यात आले आहे.

भारताने करोना लसीकरणाचे 100 कोटींचा टप्पा पार करून आज इतिहास रचला आहे. या निमित्ताने अनेक ठिकाणी उत्सव




साजरा करण्याची तयारी केली जात आहे. या अंतर्गत देशभरात कार्यक्रम आयोजित करून ज्यांनी लसीकरणासाठी योगदान दिले त्यांना कृतज्ञता व्यक्त केली जाईल. देशात 100 कोटी डोस देण्याच्या निमित्ताने आरोग्यमंत्री मनसुख मांडविया लाल किल्ल्यावरून गायक कैलाश खेर यांचे गाणे आणि दृकश्राव्य चित्रपट प्रदर्शित करणार आहेत.

दरम्यान, केंद्रीय आरोग्यमंत्री मनसुख मांडवीया यांनी बुधवारी लसीकरणासाठी पात्र असलेल्यांना विलंब न करता लसीकरण करून भारताच्या ऐतिहासिक लसीकरण प्रवासात योगदान देण्याचे आवाहन केले. मांडवीया म्हणाले की, लसीचे 100 कोटी डोस दिल्यानंतर, मिशन अंतर्गत, आम्ही याची खात्री करु की ज्यांना पहिला डोस मिळाला आहे त्यांना दुसरा डोस मिळेल जेणेकरून त्यांचे कोविड -10 पासून संरक्षण सुनिश्चित होईल. केंद्र सरकारने म्हटले आहे की ज्या गावांना 100% लसीकरण करण्यात आले आहे त्यांनी 100 कोटी डोसची विक्रम साजरा करण्यासाठी या मोहिमेतील प्रमुख आरोग्य कर्मचाऱ्यांचे गुणगान करणारे पोस्टर बॅनर लावावेत.

## राष्ट्रीय व्हॉलीबॉल स्पर्धेचे नाशिकमध्ये आयोजन

नाशिक : राष्ट्रीय व्हॉलीबॉल स्पर्धेचे येत्या शनिवारपासून नाशिक जिल्ह्यातील दिंडोरी तालुक्यातील महाजे येथे आयोजन करण्यात आले आहे. देशाच्या कानाकोपऱ्यातून जवळपास 40 संघ या स्पर्धेत सहभागी होणार आहेत.

महाराष्ट्र डायरेक्ट व्हॉलीबॉल असोसिएशन, नाशिक जिल्हा महाराष्ट्र डायरेक्ट व्हॉलीबॉल असोसिएशन आणि डायरेक्ट व्हॉलीबॉल असोसिएशन ऑफ इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने दिंडोरी तालुक्यातील महाजे येथील जिल्हा परिषद शाळेच्या प्रांगणात ही स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. शनिवार पासून ही स्पर्धा होत असून देशातील विविध राज्यांतील संघ यात सहभागी होणार असल्याची माहिती प्रदेशाध्यक्ष डी. बी. साळुंके यांनी दिली आहे.

### मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे

नोंदणी क्र. एफ्.४ – ठाणे
(सरकारमान्य 'अ' वर्ग ठाणे जिल्हा मुक्तद्वार वाचनालय)
सरस्वती मंदिर, दुसरा मजला, सुभाष पथ, जिल्हा परिषदेसमोर,
ठाणे – ४०० ६०१ दूरध्वनी : २५४०६७८७, २५४४२२५१, शाखा– २५४२४४७०

जा.क्र. १९२७/२०२१–२२ दिनांक : १६/१०/२०२१

**मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे**
**पद भरतीसाठी जाहिरात**

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे या संस्थेत पद भरती,

१) ड्रायव्हर (एक), हेवी लायसन्स आणि तीन वर्षाचा हेवी वाहन चालविण्याचा अनुभव, दहावीपर्यंत शिक्षण

२) ग्रंथपाल (एक), ग्रंथालय शास्त्राची पदवी, पदव्युत्तर पदवी, संगणकाचे ज्ञान आणि मराठी टंकलेखन आवश्यक. प्रत्यक्ष कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य.

३) ग्रंथालय साहाय्यक (दोन), बारावी आणि ग्रंथपालन प्रमाणपत्र परीक्षावर्ग उत्तीर्ण, संगणकाचे ज्ञान असावे.

४) शिपाई (दोन), दहावीपर्यंत शैक्षणिक अर्हता.

अर्ज पाठविण्याची मुदत : दिनांक ३० ऑक्टोबर २०२१ पर्यंत, सकाळी नऊ ते सायंकाळी पाच या कार्यालयीन वेळेत.

पत्ता – मराठी ग्रंथसंग्रहालय, जि. प. कार्यालयासमोर, स्टेशन रोड, ठाणे (प)

**सही/–**
**कार्यवाहक**
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे

### JITO EDUCATIONAL AND MEDICAL TRUST-THANE

INVITATION OF EXPRESSION OF INTEREST (EOI) & REQUEST FOR PROPOSAL (RFP) FOR APPOINTMENT OF ARCHITECT

Experssion of Interest & Request for Proposal are invited from the eligible Architectural Consultant having experience in detail engineering. Municipal licensing and construction services, to set up Oncology Hospital Complex and it's allied services in Thane-Maharashtra in joint association with Thane Municipal Corporation and TATA Memorial Centre.

Last date of submission is Seven days of Publication of this notice Selective tendering will be floated after the scrutiny of the proposals received under this invitation.

Please send your proposal at : 103, Dhanlaxmi Residency, L.B.S. Marg, Near Tip Top Plaza, Thane West-400604

## राज्यात कोरोनाच्या साथीचा धोकादायक स्थितीतून अंतर्जन्य स्थितीकडे प्रवास

**मुंबई : मुंबईसह राज्य आता करोना साथीच्या विळख्यातून हळूहळू बाहेर पडत आहे. करोना मर्यादित प्रमाणात दीर्घकाळ राहण्याच्या स्थितीत म्हणजेच अंतर्जन्य (एन्डेमिक) दिशेने जात असल्याचे मत तज्ज्ञांनी व्यक्त केले. म्हणजेच करोना धोक्याच्या पातळीवरुन आता नियंत्रणात येत असल्याचे आशादायी चित्र आहे.**

राज्यात करोनाची दुसरी लाट ओसरत आहे. चाचण्या वाढविल्यानंतर बाधितांची संख्या वाढते आणि चाचण्या कमी केल्या की बाधितांची संख्या घटते. मात्र, बाधितांचे प्रमाण वाढलेले नाही. त्यामुळे आता साथीच्या धोकादायक टप्प्यातून अंतर्जन्य स्थितीकडे आपण जात आहोत, असे मत करोना कृती दलाचे सदस्य डॉ. शशांक जोशी यांनी व्यक्त केले. मुंबईत सध्या जवळपास सर्वच भागांमध्ये कमी प्रमाणात रुग्ण आढळत आहेत. लसीकरणही मोठ्या प्रमाणात झाले असून, 60 ते 70 टक्के समूह प्रतिकारशक्ती नक्कीच निर्माण झाली आहे. राज्यातही अनेक जिल्ह्यांमध्ये रुग्णसंख्येचे प्रमाण खूपच कमी झाले आहे.

### PUBLIC NOTICE

Notice is hereby given to the public-at-large by my client Mr. Vijay Chiranjilal Agarwal (Lala) of Shanta Sadan, Gokhale Road, Naupada, Thane (W) 400 602 that a Special Civil Suit bearing No. 874 of 1996 (Mr. Amit Tulsidas Agarwal & Anr. Vs. Mr. Vijay C. Agarwal & Ors) in respect of the property described in the Schedule of Property hereunder written is pending in the Hon'ble Civil Court (Senior Division) Thane at Thane; wherein the Hon'ble Court has directed the parties to maintain status-quo till further orders.

The status-quo orders passed by the Hon'ble Civil Court, Thane at Thane in Special Civil Suit No. 874 of 1996, pertaining to the property described in the Schedule of Property hereunder written, are in force and in existence.

In view of what is stated hereinabove; Notice is given to the public-at-large to desist & refrain from executing any sale deed(s), conveyance(s), transfer(s), deed(s), document(s), agreement(s), transaction(s), etc. in respect of the property described in the Schedule of Property hereunder written; failing which such person(s), party(ies) etc. may not only be held liable for Contempt of Court proceedings but also my client shall be constrained to initiate legal proceeding(s) of civil nature in addition to lodging criminal prosecution against all such person(s), party(ies), etc. of which the public-at-large is called upon by my client to take a serious & careful note.

SCHEDULE OF PROPERTY

ALL that piece and parcel of property bearing Tika No.21, CTS No.14, 15(B) and 9 together with structures standing thereon situate lying and being at Village Naupada, Thane, Tal. & Dist. Thane, within the limits of Municipal Corporation of City of Thane, registration District & Sub District Thane.

**Mr. Jaideep M. Patkar**
**Advocate**
3 rd Floor, Fen-Kin Capital Bldg., Ram Maruti Road, Naupada, Opp. Celebrations Shop, Thane (W) 400 602

**Date :** 21-10-2021 **Place :** Thane

### जाहिर नोटीस

तमाम लोकांना या नोटीसी द्वारे कळविण्यांत येते कि, मि, खालील सही करणार श्री.मारुती रघुनाथ गायकवाड वय ४७ वर्षे,, रा.मुरबाड, पो.ता.मुरबाड जि.ठाणे,आज रोजी या सत्यप्रतिज्ञा पत्राद्वारे असे लिहून देतो कि,माझे नावे मुरबाड नगरपंचायत दफ्तरी नोंद असलेली प्रमुख दर्शन अपार्टमेंट या इमारती मधील बी विंग मधील तळमजल्यावरील,निवासी सदनिका नं–००३,क्षेत्रफळ,६०० चौ.फुट,( बांधीव )मुरबाड नगरपंचायत मालमत्ता घर क्रमांक २८७०( ब्लॉक नंबर –००३ ),हि , मालमत्ता मि माझी पत्नी ,श्रीमती–सुष्मा मारुती गायकवाड, हिस संमतीपत्राद्वारे कायम स्वरुपी देत असुन, सदर घराची घरपट्टी, व अँसेसमेंट उतारा श्रीमती–सुष्मा मारुती गायकवाड ह्यांचे नावे होण्यास माझी कुठल्याही प्रकारची हरकत किंवा तक्रार नसून ' समंतीच आहे. तसे मा.तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी मुरबाड यांचे समोर सत्य प्रतिज्ञापत्राद्वारे लिहून देत आहे. तरी ,सदर मालमत्ता २८७० हि त्यांचे नावे दफ्तरी नोंद होवून त्याची घरपट्टी, अँसेसमेंट उतारा, त्याचे नावे करण्यात यावे. याबाबत कोणाची काही हरकत असल्यास हि नोटीस प्रसिद्ध झाले पासुन आठ दिवसांचे आत लेखी कागदपत्रे पुराव्यासह निदर्शनास आणून देणे.तद्नंतर कोणाची कसलीही तक्रार अथवा हरकत ग्राह्य धरली जाणार नाही. याची नोंद घ्यावी. हे सर्वांस कळावे.हि विनंती..कळावे.

**आपले विश्वासु**
**सही ––**
**१)श्री.मारुती रघुनाथ गायकवाड,**
**लिहून देणार**
**२)श्रीमती–सुष्मा मारुती गायकवाड**
**लिहून घेणार**

### ठाणे महानगरपालिका, ठाणे

सा.बां.विभाग
निविदा सुचना

ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील मुंब्रा प्रभाग समिती क्षेत्रातील " प्रभाग सुधारणा **निधी** "लेखाशिर्षका अंतर्गत **मुंब्रा प्रभाग समिती अंतर्गत प्र. क्र.** ३१ (क) मधील एकूण तीन कामांकरिता ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहेत. ज्या कंत्राटदारांविरुध्द शासकीय/ निमशासकीय/ सार्वजनिक क्षेत्रातील संस्था व उपक्रम / स्थानिक स्वराज्य संस्था इ. यांनी शिस्तभंगाचे कार्यवाहिच्याअनुषंगाने नोंदणी पत्र रद्दकरण्याची कार्यवाही केली / सुरु आहे, अशा कंत्राटदारांना निविदाप्रक्रियेत भाग घेता येणार नाही. निविदा सुचना ठाणे महानगरपालिकेचे संकेतस्थळ वर दि. २२/ १०/ २०२१ ते दि.०५/११/२०२१ पर्यंत उपलब्ध आहे. ऑनलाईन निविदा महापालिकेचे संकेतस्थळ येथे https:://mahatenders.gov.in दि. ०५/११/२०२१ रोजी पर्यंत सायं. १६.०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील. निविदा दि.०९/११/२०२१ सायं. १६.०० वाजता निविदाकार अथवा त्यांचे प्रतिनिधीसमक्ष उघडण्यात येतील.

ठामपा/पिआरओ/पिडब्ल्यूडी-मुंब्रा/७८३/२१-२२ **सही/-**
दि:२१.१०.२०२१ कार्यकारी अभियंता
*plsvisitourofficialweb-site* ठाणे महानगरपालिका,ठाणे
*www.thanecity.gov.in*

**संरक्षित रहा, कोरोना विषाणूंपासून सुरक्षित रहा !**

### अप्पर जिल्हाधिकारी, ठाणे यांचे कोर्टात
### जाहिर नोटीस

क्र. आरटीएस/अपिल क्र. १११/२१ दिनांक :- १४/१०/२०२१

१) श्रीम. गंगाबाई सुकऱ्या भंडारी श्रीम. गंगाबाई नरसु भोईर रा. मेन रोड, रिक्षा स्टँडजवळ, चौधरपाडा, लोनाड, ता. जि. ठाणे तर्फे कुळमुखत्यार म्हणुन श्री. करसन आत्माराम शिंदे रा. मोहने रोड, महावीर किराणा स्टोअर जवळ, धाकटे शहाड, ता. कल्याण, जि. ठाणे **...अपिलार्थी**

विरुद्ध

१) श्री. जनार्दन जानु भोईर २) श्री. पंढरी जानु भोईर ३) श्री. वसंत जानु भोईर ४) श्री. बाळकृष्ण जानु भोईर ५) श्री. तुळशीराम जानु भोईर ६) परशुराम जानु भोईर ७) श्रीम. बारकुबाई चांगो भोईर ८) श्री. गणेश चांगो भोईर ९) शोभा चांगो भोईर १०) आशा चांगो भोईर ११) वंदना चांगो भोईर १२) लक्ष्मी चांगो भोईर १३) श्री. अशोक धर्मा भोईर १४) श्री. राम धर्मा भोईर १५) श्रीम. उषाबाई धर्मा भोईर १६) अरुधा धर्मा भोईर १७) श्री. रमेश यशवंत भोईर १८) श्री. बाळाराम यशवंत भोईर १९) श्री. ध्रुपदा इनंत मिरकुटे २०) सतिष कृष्णा देशेकर २१) योगिता कृष्णा देशेकर २२) रिना कृष्णा देशेकर २३) श्रीम. वंदना अनंता भोईर (मयत) २४) श्री. साईनाथ अनंता भोईर २५) अश्विनी अनंता भोईर २६) अर्चना अनंता भोईर, २७) शेवंती अनंता भोईर २८) अस्मिता अनंता भोईर, २९) विनोद प्रकाश भोईर ३०) विशाल प्रकाश भोईर ३१) गौरव प्रकाश भोईर., सर्व रा. मांडा-टिटवाळा ता. कल्याण, जि. ठाणे

कार्यक्षेत्र :- तलाठी सजा-मांडे **...सामनेवाले**

उपविभागीय अधिकारी कल्याण विभाग कल्याण यांचेकडील आदेश क्र आरटीएस कावि ३१/२०१९ दिनांक १८/०२/२०२० रोजी दिलेल्या निर्णयाविरुध्द व्यथित होऊन आपलार्थी यांनी इकडील अर्धन्यायिक न्यायालयात अपिल दाखल केले. सदर अपिलाची सुनावणी दि. १७/११/२०२१ रोजी सकाळी ११.00 वाजता ठेवण्यात आली असून सामनेवाले क्र.७ ते ३१ यांनी सदर दिवशी स्वत: अथवा त्यांचे कायदेशीर प्रतिनिधी यांनी हजर राहावे. जर सामनेवाले हे सुनावणीच्या दिवशी इकडील अर्धन्यायिक न्यायालयात हजर झाले नाहीत. तर सदर आपलाकामी त्यांचे काही एक म्हणणे नाही असे समजून अपिलाची एकतर्फी सुनावणी घेऊन अपिलाचा गुणवत्तेवर निकाल दिला जाईल यांची नोंद घ्यावी. सही/-

**ठिकाण**-ठाणे (शिक्का) **वैदेही रानडे**
**दिनांक**- १४/१०/२०२१ अप्पर-जिल्हाधिकारी, ठाणे

### जाहिर नोटीस

सदर जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते की, माझे अशिल श्री. राजेश ठाकर्या गौरी राहणार– माणगांव, ता. व जि. रायगड यांचेवतीने तुम्ही १. श्री. हस्तीमल सरदारमल पारेख (मयत तर्फे वारस) श्री. दिपेश हस्तीमल पारेख, २. श्री. कांतीलाल सरदारमल पारेख, ३. श्री. चंपालाल सरदारमल पारेख (मयत तर्फे वारस), श्री. विक्रम चंपालाल पारेख, ४. श्री. विमलकुमार सरदारमल पारेख (मयत तर्फे वारस) श्री. राहुल विमलकुमार पारेख, ५. श्री. अशोककुमार सरदारमल पारेख, सर्व सज्ञान, राहणार– ठाणे, ता. व जि. ठाणे, ६. श्री. नरेश पुंडलिक गौरी, ७. श्री. पद्मन पुंडलिक गौरी, ८. श्री. सुनिल पुंडलिक गौरी, ९. श्री. राकेश पांडुरंग गौरी, १०. श्री. कांचन पांडुरंग गौरी, ११. श्री. मंगेश पांडुरंग गौरी, १२. श्रीमती सुनिता पांडुरंग गौरी, १३. श्रीमती. रामीबाई ठाकर्या लासे, १४. श्रीमती. सावित्रीबाई आत्माराम पाटील, १५. श्रीमती रजनी गोविंद माळी, १६. श्रीमती सुरेखा पांडुरंग गौरी, १७. श्रीमती. हिरूबाई पुंडलिक गौरी, ६ ते १७ सर्व राहणार– खारेगांव, ता. व जि. ठाणे यांचे विरूद्ध मौजे– पारसिक, ता. व जि. ठाणे येथील सर्व्हे नं. ६७, हिस्सा नं. २, या मिळकतीसंदर्भात मा. अपर मामलेदार व शेतजमिन न्यायाधिकरण नं. २, ठाणे यांनी क्र.व्हीआर–७ कामी दिनांक २०/११/१९६३ रोजी दिलेल्या निकालाविरूद्ध मा. उपविभागीय अधिकारी, ठाणे यांचे न्यायालयात टेनन्सी अपिल क्र. १४२/२०२१ दाखल केले असून सदर अपिलाची सुनावणी खालील पत्त्यावर दिनांक २९/१०/२०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता ठेवण्यात आली असून तुम्ही सदर दिवशी इकडील न्यायालयात हजर झाले नाहीत तर सदर अपिलाकामी तुमचे काही एक म्हणणे नाही, असे समजून अपिलाची एकतर्फी सुनावणी घेवुन अपिलाचा गुणवत्तेवर निकाल दिला जाईल. याची नोंद घ्यावी.

पत्ता : मा. उपविभागीय अधिकारी, ठाणे, जिल्हाधिकारी कार्यालय, दुसरा मजला, ठाणे– ४००६०१

**सही/–**
**मयुर पां. काते**
**(बी.ए.एलएल.बी.)**
वकील

### अप्पर जिल्हाधिकारी, ठाणे यांचे कोर्टात
### जाहीर नोटीस

**क्र. आरटीएस/अपील क्र. ५६/१९**
**दिनांक :- २४/०९/२०२१**

श्री. वसंत दामु धुळे
राहणार :- जोवेली, तालुका अंबरनाथ, जिल्हा ठाणे ...अपिलार्थी

**विरुद्ध**

१) फौजिया अनिस कोहारी, राहणार- कराची, पाकिस्तान
२) शमीम सत्तार पटेल, राहणार- शारजा, यु.ए.ई.
३) रिफत असिम कोहारी, अमेरिकन आय डी नं. ए ५३२-७२१-४७-८४५०,
रा. १४२३, वेसले कोर्ट, वेसले चॅपल, एफ. जे. ३३५४/०३
४) परवेज सिध्दीक कोहारी, राहणार- कराची, पाकिस्तान
५) सौ. सिमा फरिद तुंगेकर
राहणार- ६०३, एव्हरेस्ट को-ऑप.हौ.सो. प्लॉट नं. १०, वर्सोवा, अंधेरी वेस्ट, मुंबई- ४०० ०५८ दुसरा पत्ता :- कुवेत, सध्या पुणे
६) श्री. एस. सी. भागवानी मयततर्फे वारस
अ) पार्वती सेवाराम भागवानी
ब) राजेश सेवाराम भागवानी
क) सुनिल राजेश भागवानी
ड) मीना लक्ष्मणदास रामसिंघानी
इ) शांती भगवानदास तलरेजा
फ) राम सेवाराम भागवानी
ग) जयराम सेवाराम भागवानी
क्रं. 'ब' तर्फे कुलमुखत्यारपत्रधारक
श्री. शैलेंद्र निंबागिरी गोसावी
राहणार : ललित हाईटस, फ्लॅट नं. ००१, सचिन सोसायटी, कुळगांव, बदलापूर पूर्व,
ता. अंबरनाथ, जि. : ठाणे ४२१ ५०३
आणि क्र. ६ अ ते 'ग' तर्फे कुलमुखत्यार
रवि सुरेश चावला, राहणार - २०२८, श्यामसुंदर निवास, सेक्शन-३७, उल्हासनगर-५,
ता. उल्हासनगर, जि. ठाणे
७) श्री. शामुन अहमद मुल्ला, रा. बदलापूर गांव, ता. अंबरनाथ, जिल्हा : ठाणे
क्र. ७ स्वत:करिता व क्र. १ ते ५ यांचेतर्फे कुलमुखत्यारी म्हणून **...सामनेवाले**

उपविभागीय अधिकारी उल्हासनगर विभाग, उल्हासनगर यांचेकडील आरटीएस अपिल क्र. ७९/२०१८ दि. ३०/०३/२०१९ रोजी दिलेल्या निर्णयाविरुध्द व्यथित होऊन अपिलार्थी यांनी इकडील अर्धन्यायिक न्यायालयात अपिल दाखल केले.

सदर अपिलाची सुनावणी दि. २९/१०/२०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता ठेवण्यात आली असून सामनेवाले यांनी सदर दिवशी स्वत: अथवा त्यांचे कायदेशीर प्रतिनिधी यांनी हजर राहावे. जर सामनेवाले हे सुनावणीच्या दिवशी इकडील न्यायालयात हजर झाले नाहीत तर सदर अपिलाकामी त्यांचे काही एक म्हणणे नाही असे समजून अपिलाची एकतर्फी सुनावणी घेऊन अपिलाचा गुणवत्तेवर निकाल दिला जाईल यांची नोंद घ्यावी.

**ठिकाण :- ठाणे** सही/-
**दिनांक : २४/०९/२०२१** (शिक्का) **(वैदेही रानडे)**
**माझ्या सही व शिक्क्याने** **अप्पर जिल्हाधिकारी, ठाणे**

### अप्पर जिल्हाधिकारी, ठाणे यांचे कोर्टात
### जाहीर नोटीस

**क्र. आरटीएस/अपील क्र. ५५/१९**
**दिनांक :- २४/०९/२०२१**

१) श्री. मुरलीधर वाळकु धुळे
२) श्री. संजय वाळकु धुळे
३) श्रीम. शांता सजन भोईर
राहणार :- जोवेली, तालुका अंबरनाथ, जिल्हा : ठाणे ...अपिलार्थी

**विरुद्ध**

१) फौजिया अनिस कोहारी, राहणार- कराची, पाकिस्तान
२) शमीम सत्तार पटेल, राहणार- शारजा, यु.ए.ई.
३) रिफत असिम कोहारी, अमेरिकन आय डी नं. ए ५३२-७२१-४७-८४५०,
रा. १४२३, वेसले कोर्ट, वेसले चॅपल, एफ. जे. ३३५४/०३
४) परवेज सिध्दीक कोहारी, राहणार- कराची, पाकिस्तान
५) सौ. सिमा फरिद तुंगेकर, राहणार- ६०३, एव्हरेस्ट को-ऑप.हौ.सो. प्लॉट नं. १०, वर्सोवा, अंधेरी वेस्ट, मुंबई ४०० ०५८ दुसरा पत्ता :- कुवेत, सध्या पुणे
६) श्री. एस. सी. भागवानी मयततर्फे वारस
अ) पार्वती सेवाराम भागवानी
ब) राजेश सेवाराम भागवानी
क) सुनिल राजेश भागवानी
ड) मीना लक्ष्मणदास रामसिंघानी
इ) शांती भगवानदास तलरेजा
फ) राम सेवाराम भागवानी
ग) जयराम सेवाराम भागवानी
क्रं. 'ब' तर्फे कुलमुखत्यारपत्रधारक
श्री. शैलेंद्र निंबागिरी गोसावी
राहणार : ललित हाईटस, फ्लॅट नं. ००१, सचिन सोसायटी, कुळगांव, बदलापूर पूर्व,
ता. अंबरनाथ, जि. ठाणे- ४२१५०३ आणि क्र. ६ अ ते 'ग' तर्फे कुलमुखत्यार
रवि सुरेश चावला, राहणार - २०२८, श्यामसुंदर निवास, सेक्शन-३७, उल्हासनगर-५,
ता. उल्हासनगर, जि. - ठाणे
७) श्री. शामुन अहमद मुल्ला रा. बदलापूर गांव, ता. अंबरनाथ, जिल्हा : ठाणे
क्र. ७ स्वत:करिता व क्र. १ ते ५ यांचेतर्फे कुलमुखत्यारी म्हणून **...सामनेवाले**

उपविभागीय अधिकारी उल्हासनगर विभाग, उल्हासनगर यांचेकडील आरटीएस अपिल क्र. ८१/२०१८ दि. ३०/०३/२०१९ रोजी दिलेल्या निर्णयाविरुध्द व्यथित होऊन अपिलार्थी यांनी इकडील अर्धन्यायिक न्यायालयात अपील दाखल केले.

सदर अपिलाची सुनावणी दि. २९/१०/२०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता ठेवण्यात आली असून सामनेवाले यांनी सदर दिवशी स्वत: अथवा त्यांचे कायदेशीर प्रतिनिधी यांनी हजर राहावे. जर सामनेवाले हे सुनावणीच्या दिवशी इकडील न्यायालयात हजर झाले नाहीत तर सदर अपिलाकामी त्यांचे काही एक म्हणणे नाही असे समजून अपिलाची एकतर्फी सुनावणी घेऊन अपिलाचा गुणवत्तेवर निकाल दिला जाईल यांची नोंद घ्यावी.

**ठिकाण :- ठाणे** सही/-
**दिनांक : २४/०९/२०२१** (शिक्का) **(वैदेही रानडे)**
**माझ्या सही व शिक्क्याने** **अप्पर जिल्हाधिकारी, ठाणे**

### अप्पर जिल्हाधिकारी, ठाणे यांचे कोर्टात
### जाहीर नोटीस

**क्र. आरटीएस/अपील क्र. ५७/१९**
**दिनांक :- २४/०९/२०२१**

श्री. शिवदास रामू केणे
राहणार :- जोवेली, तालुका अंबरनाथ, जिल्हा : ठाणे ...अपिलार्थी

**विरुद्ध**

१) फौजिया अनिस कोहारी, राहणार- कराची, पाकिस्तान
२) शमीम सत्तार पटेल, राहणार- शारजा, यु.ए.ई.
३) रिफत असिम कोहारी, अमेरिकन आय डी नं. ए ५३२-७२१-४७-८४५०,
रा. १४२३, वेसले कोर्ट, वेसले चॅपल, एफ. जे. ३३५४/०३
४) परवेज सिध्दीक कोहारी, राहणार- कराची, पाकिस्तान
५) सौ. सिमा फरिद तुंगेकर, राहणार- ६०३, एव्हरेस्ट को-ऑप.हौ.सो., प्लॉट नं. १०, वर्सोवा, अंधेरी वेस्ट, मुंबई ४०० ०५८ दुसरा पत्ता :- कुवेत, सध्या पुणे
६) श्री. एस. सी. भागवानी मयततर्फे वारस
अ) पार्वती सेवाराम भागवानी
ब) राजेश सेवाराम भागवानी
क) सुनिल राजेश भागवानी
ड) मीना लक्ष्मणदास रामसिंघानी
इ) शांती भगवानदास तलरेजा
फ) राम सेवाराम भागवानी
ग) जयराम सेवाराम भागवानी
क्रं. 'ब' तर्फे कुलमुखत्यारपत्रधारक
श्री. शैलेंद्र निंबागिरी गोसावी
राहणार : ललित हाईटस, फ्लॅट नं. ००१, सचिन सोसायटी, कुळगांव, बदलापूर पूर्व,
ता. अंबरनाथ, जि. ठाणे- ४२१ ५०३ आणि क्र. ६ अ ते 'ग' तर्फे कुलमुखत्यार
रवि सुरेश चावला
राहणार - २०२८, श्यामसुंदर निवास, सेक्शन-३७, उल्हासनगर-५,
ता. उल्हासनगर, जि. ठाणे
७) श्री. शामुन अहमद मुल्ला
रा. बदलापूर गांव, ता. अंबरनाथ, जिल्हा : ठाणे
क्र. ७ स्वत:करिता व क्र. १ ते ५ यांचेतर्फे कुलमुखत्यारी म्हणून **...सामनेवाले**

उपविभागीय अधिकारी उल्हासनगर विभाग, उल्हासनगर यांचेकडील आरटीएस अपील क्र. ८२/२०१८ दि. ३०/०३/२०१९ रोजी दिलेल्या निर्णयाविरुध्द व्यथित होऊन अपिलार्थी यांनी इकडील अर्धन्यायिक न्यायालयात अपील दाखल केले.

सदर अपिलाची सुनावणी दि. २९/१०/२०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता ठेवण्यात आली असून सामनेवाले यांनी सदर दिवशी स्वत: अथवा त्यांचे कायदेशीर प्रतिनिधी यांनी हजर राहावे. जर सामनेवाले हे सुनावणीच्या दिवशी इकडील न्यायालयात हजर झाले नाहीत तर सदर अपिलाकामी त्यांचे काही एक म्हणणे नाही असे समजून अपिलाची एकतर्फी सुनावणी घेऊन अपिलाचा गुणवत्तेवर निकाल दिला जाईल यांची नोंद घ्यावी.

**ठिकाण :- ठाणे** सही/-
**दिनांक : २४/०९/२०२१** (शिक्का) **(वैदेही रानडे)**
**माझ्या सही व शिक्क्याने** **अप्पर जिल्हाधिकारी, ठाणे**

### जाहिर नोटीस

सदर जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते की, माझे अशिल श्री. राजेश ठाकर्या गौरी राहणार– माणगांव, ता. व जि. रायगड यांचेवतीने तुम्ही १. श्री. हस्तीमल सरदारमल पारेख (मयत तर्फे वारस) श्री. दिपेश हस्तीमल पारेख, २. श्री. कांतीलाल सरदारमल पारेख, ३. श्री. चंपालाल सरदारमल पारेख (मयत तर्फे वारस), श्री. विक्रम चंपालाल पारेख, ४. श्री. विमलकुमार सरदारमल पारेख (मयत तर्फे वारस) श्री. राहुल विमलकुमार पारेख, ५. श्री. अशोककुमार सरदारमल पारेख, सर्व सज्ञान, राहणार– ठाणे, ता. व जि. ठाणे, ६. श्री. नरेश पुंडलिक गौरी, ७. श्री. पद्मन पुंडलिक गौरी, ८. श्री. सुनिल पुंडलिक गौरी, ९. श्री. राकेश पांडुरंग गौरी, १०. श्री. कांचन पांडुरंग गौरी, ११. श्री. मंगेश पांडुरंग गौरी, १२. श्रीमती सुनिता पांडुरंग गौरी, १३. श्रीमती. रामीबाई ठाकर्या लासे, १४. श्रीमती. सावित्रीबाई आत्माराम पाटील, १५. श्रीमती रजनी गोविंद माळी, १६. श्रीमती सुरेखा पांडुरंग गौरी, १७. श्रीमती. हिरूबाई पुंडलिक गौरी, ६ ते १७ सर्व सज्ञान राहणार– खारेगांव, ता. व जि. ठाणे यांचे विरूद्ध मौजे– पारसिक, ता. व जि. ठाणे येथील सर्व्हे नं. ६७, हिस्सा नं. १ गट नंबर ६७ हिस्सा नं. २, या मिळकतीसंदर्भात मा. अपर तहसिलदार व शेतजमिन न्यायाधिकरण , ठाणे यांनी केस क्र. एलएसपी/।।/३२ग/ पारसिक/१९ कामी दिनांक १८/०९/१९८७ रोजी दिलेल्या निकालाविरूद्ध मा. उपविभागीय अधिकारी, ठाणे यांचे न्यायालयात टेनन्सी अपिल क्र. १४३/२०२१ दाखल केले असून सदर अपिलाची सुनावणी खालील पत्त्यावर दिनांक २९/१०/२०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता ठेवण्यात आली असून तुम्ही सदर दिवशी इकडील न्यायालयात हजर झाले नाहीत तर सदर अपिलाकामी तुमचे काही एक म्हणणे नाही, असे समजून अपिलाची एकतर्फी सुनावणी घेवुन अपिलाचा गुणवत्तेवर निकाल दिला जाईल. याची नोंद घ्यावी.

पत्ता : मा. उपविभागीय अधिकारी, ठाणे, जिल्हाधिकारी कार्यालय, दुसरा मजला, ठाणे– ४००६०१

**सही/–**
**मयुर पां. काते**
**(बी.ए.एलएल.बी.)**
वकील

Sheth T.J. Education Society's

**SHETH NANJIBHAI KHIMJIBHAI THAKKAR THANAWALA COLLEGE OF COMMERCE & SHETH JAYANTILAL TRIBHOVANDAS THANAWALA COLLEGE OF ARTS**

Kharkar Ali, Thane (W) - 400 601.

**LINGUISTIC MINORITY COLLEGE**

APPLICATIONS ARE INVITED FOR THE FOLLOWING **CLOCK HOUR BASIS** POSTS FOR THE ACADEMIC YEAR 2021-22.

**AIDED**

| Sr. No. | Cadre | Subject | Total No. of CHB Posts | Category |
|---|---|---|---|---|
| 1. | Assistant Professor | Psychology | 01 | 01-OPEN |
| 2. | Assistant Professor | Mathematics | 01 | 01-OPEN |
| 3. | Assistant Professor | Environmental Studies | 01 | 01-OPEN |
| 4. | Assistant Professor | English | 02 | 02-OPEN |

The above posts are open to all, however, candidates from any category can apply for the post. Reservation for women will be as per **University Circular No. BCC/16/74/1998 dated 10th March, 1998. 4% reservation shall be for the persons with disability as per University Circular No. Special Cell/ICC/2019-20/05 dated 5th July, 2019.**

**Candidates having knowledge of Marathi will be preferred.**

**"Qualification, Pay Scales and other requirement are as prescribed by the UGC Notification dated 18th July, 2018, Government of Maharashtra Resolution No. Misc-2018/C.R.56/18/UNI-1, dated 8th March, 2019 and University Circular No. TAAS/(CT)/ICD/2018-19/1241, dated 26th March, 2019 and revised from time to time."**

**Remuneration of the above post will be as per University Circular No. TAAS(CT)/01/2019-2020 dated 2nd April, 2019.**

**The Government Resolution & Circular are available on the website mu.ac.**in.

Application with full details should reach the **PRINCIPAL, Sheth T.J. Education Society's SHETH NANJIBHAI KHIMJIBHAI THAKKAR THANAWALA COLLEGE OF COMMERCE AND SHETH JAYANTILAL TRIBHOVANDAS THANAWALA COLLEGE OF ARTS, Kharkar Ali, Thane (W), Pin-400 601,** within 15 days from the date of publication of this advertisement. **This is University approved advertisement**.

**Sd/-**
PRINCIPAL

## CLASSIFIEDS ठाणेवैभव

**छोट्या जाहिरातींसाठी संपर्क कार्यालय**
**ठाणे - २५३४१५२६/२५३४८५९४**

**ऑफिस भाड्याने देणे आहे**

टोटल कार्पेट एरिया, ११५८.६७ स्क्वे.फु., ३ कॅबिन, १ रिसेप्शन, १ पॅन्ट्री, २ बाथरूम टेरेस सोबत शिवनेरी बिल्डिंग, पहिला माळा, गावदेवी, ठाणे रेल्वे स्टेशनजवळ. ८९७६८२३७५२

**विकणे आहे**

टेंभी नाका परिसरात २०० आणि २५० चौ.फूटाचा बेसमेंट गाले विकायला आहे.
संपर्क – ९८१९२४९२८०

**पाहिजेत**

नामांकित रक्तपेढीसाठी डिलेव्हरीसाठी (बाईक असणाऱ्यास प्राधान्य) मुले पाहिजेत. पत्ता – ब्लडलाईन ब्लड बँक, आंबेडकर रोड, खोपट, ठाणे (प)
संपर्क – ०२२–२५३७५०००/ ६०००

**'ठाणेवैभव' दैनिकातील जाहिराती या जाहिरातदारांनी दिलेल्या मजकुरानुसार छापल्या जातात. या मजकुराच्या सत्यतेबाबतची खातरजमा वाचकांनी स्वतःच्या जबाबदारीवर करावयाची आहे. 'ठाणेवैभव' यांचा याबाबत कोणतीही आर्थिक वा कायदेशीर प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष जबाबदारी राहणार नाही.**

**हात स्वच्छ धुवा कोरोना टाळा**

विज्ञानविश्वाची माहितीपूर्ण रंजक सफर

# विज्ञानवार्ता

## कोरोना लसीसाठी अजगर उपयुक्त?

सापाच्या विषापासून अनेक औषधेही बनवली जात असतात. अजगर हा एक बिनविषारी सर्प आहे. मात्र, त्याच्या शरीरात एक असा द्रवपदार्थ असतो ज्याचा वापर आता कोरोनावरील लस बनवण्यासाठी केला जात आहे. अमेरिकन संशोधकांनी म्हटले आहे की अजगराच्या शरीरात आढळणाऱ्या 'स्क्वॅलिन' या पदार्थामुळे शक्तिशाली रोगप्रतिकारक क्षमता निर्माण होते. जागतिक आरोग्य संघटनेनेही हा पदार्थ सुरक्षित असल्याचे म्हटले आहे.



अमेरिकेचा 'ग्लोबल रिसर्च अँड डिस्कव्हरी ग्रुप' मेंदूच्या विविध आजारांवर औषधे शोधण्यासाठी प्रसिद्ध आहे. याच समूहातील डस्टिन क्रम आणि डेरिल थॉम्पसन हे संशोधक लसीवर काम करीत आहेत. त्यांनी म्हटले आहे की दहा फुटांच्या अजगरातून बाहेर काढलेल्या स्क्वॅलिनच्या सहाय्याने लसीचे ३५०० डोस तयार केले जाऊ शकतात. हे संशोधन वादग्रस्त होऊ नये म्हणून त्यांनी कृत्रिम स्क्वॅलिन बनवण्याचेही प्रयत्न केले; पण ते यशस्वी ठरले नाहीत. त्यामुळे अजगराच्याच स्क्वॅलिनपासून लस विकसित केली जात आहे. जागतिक आरोग्य संघटनेने दिलेल्या माहितीनुसार स्क्वॅलिनचा वापर सर्वप्रथम १९९७ मध्ये एन्फ्लुएंझाची लस बनवण्यासाठी करण्यात आला होता.

त्यावेळी लसीचे २.२ कोटी डोस तयार करण्यात आले होते. स्क्वॅलिन हा तेलासारखा दिसणारा पदार्थ आहे. तो शार्क माशाच्या यकृतामध्येही आढळतो. मात्र, माशांमधून तो बाहेर काढणे वादग्रस्त ठरू शकते म्हणून बर्मीज अजगरांचा यासाठी वापर केला जात आहे. ◆◆◆



## शोध नव्या एअर प्युरिफायरचा

सध्या भारताबरोबरच अवघ्या जगालाही हवेच्या प्रदूषणाचा सामना करावा लागत आहे. 'इनडोअर' आणि 'आऊटडोअर' अशा दोन्ही प्रकारच्या प्रदूषणामुळे लोकांच्या आरोग्यावरही विपरित परिणाम होत आहे. भारतात होणाऱ्या मृत्यूंमागे प्रदूषण हेही एक मोठे कारण आहे. आता 'आऊटडोअर' म्हणजेच घराबाहेरचे हवेतील प्रदूषण कमी करण्यासाठी पश्चिम बंगालमधील दुर्गापूर येथील 'सीएसआयआर' संस्थेशी निगडीत केंद्रीय मेकॅनिकल इंजिनिअरिंग संशोधन संस्थेने एक 'एअर प्युरिफायर' विकसित केला आहे.

या संस्थेचे संचालक प्राध्यापक डॉ. हरिश हिरानी यांनी सांगितले की हा एअर प्युरिफायर पाच मीटरच्या वर्तुळातील हवा शुद्ध करू शकतो. हवेतील प्रदूषकांना तो ५० टक्क्यांपर्यंत कमी करतो. जर एखाद्या विशिष्ट वेळेत हवेचे प्रदूषण कमी करायचे असेल तर त्यासाठी यामध्ये 'टायमर'चीही सुविधा आहे. हा प्युरिफायर तयार करण्यासाठी २५ ते ३० हजार रुपयांचा खर्च येऊ शकतो. त्याचे संचालन सौरऊर्जेच्या माध्यमातून केले जाऊ शकते. हे यंत्र रस्त्याच्या कडेलाही ठेवता येऊ शकते. त्यामुळे वाहनांमुळे होणारे हवेचे प्रदूषण कमी करण्यास मदत मिळेल. ◆◆◆

## 'नव्या कोरोना'च्या शोधासाठी...

सध्या जगातील अनेक देशांत कोरोना व्हायरसचे नवे 'व्हेरिएंट' कडवे आव्हान देत आहे. या व्हेरिएंटचे आव्हान मोडून काढण्याच्या दिशेने पाऊल टाकताना संशोधकांनी दोन नव्या 'डायग्नोस्टिक टेस्ट' विकसित केल्या आहेत. यातील एका टेस्टमध्ये नव्या व्हेरिएंटची ओळख होईल. तर, दुसऱ्या टेस्टमध्ये आजारांची लक्षणे समजतील, जी कोरोना संक्रमणाने होतात.

'बायोइंजिनिअरिंग' पत्रिकेमध्ये कोरोनाच्या नव्या व्हेरिएंटचे आव्हान मोडून काढण्यासाठी विकसित करण्यात आलेल्या दोन टेस्टसंबंधीचे संशोधन प्रसिद्ध करण्यात आले आहे. अमेरिकेतील 'मिनिसोटा युनिव्हर्सिटी'चे संशोधक मार्क जे आसबोर्न यांनी सांगितले की, कोरोनाचे कारण बनणाऱ्या 'सार्स-कोव-२' या व्हायरसविरुद्ध सध्या अनेक लसींना मंजुरी देण्यात आली आहे. ही बाब निश्चितपणे समाधानाची आहे. असे असले तरी पहिल्या लसीकरणानंतर इम्युनिटी तयार होण्यास काही काळ लागतो. यामुळे नवी टेस्ट ही टेस्टिंग प्लॅटफॉर्म लसीकरण आणि इम्युनिटी यांच्यातील अंतर कमी करण्याचा प्रयत्न करते. पहिली टेस्ट ही रॅपिड डायग्नोस्टिक टेस्ट असते. यामध्ये कोरोनाच्या व्हेरिएंटमधील फरक ओळखता येतो.

याचा अहवाल अवघ्या तासाभरात येतो. तर, दुसऱ्या टेस्टमध्ये आजारांच्या लक्षणातील फरक ओळखता येतो. जे कोरोना संसर्ग झाल्यानंतर आढळून येतो. या टेस्टचा अहवालसुद्धा अवघ्या तासाभरात मिळतो. ◆◆◆




## ध्रुवीय अस्वले संकटात!

जलवायू परिवर्तनचा परिणाम सध्या केवळ हवामान व माणसावरच नव्हे तर प्राण्यांवरही होत आहे. तसे पाहिल्यास ग्लोबल वॉर्मिंगचा सर्वाधिक फटका बर्फाच्छादित ध्रुवीय प्रदेशाला बसत आहे. यामुळे वेगाने बर्फाची चादर वितळू लागली आहे. याचा परिणाम ध्रुवीय अस्वलांवरही होत आहे. ग्लोबल वॉर्मिंगमुळे या अस्वलांना शिकार करण्यासाठी पूर्वीपेक्षा चार पटीने ऊर्जा खर्च करावी लागत आहे.

आर्क्टिक भागातील बर्फ वेगाने वितळू लागला आहे. यासंदर्भात यापूर्वी करण्यात आलेल्या अनेक संशोधनामध्ये ग्लोबल वॉर्मिंगची समस्या गंभीर रूप धारण करत असल्याचा इशारा देण्यात आला आहे. या भागातील वातावरणात होत असलेल्या बदलांमुळे तेथील ध्रुवीय अस्वल यासारख्या शिकारी प्राण्यांना आपल्या सवयींमध्ये बदल करावा लागत आहे.

ध्रुवीय भागात राहणाऱ्या या अस्वलांना स्वत:ला वाचविण्यासाठी सध्या पूर्वीपेक्षा चार पटीने अधिक ऊर्जा खर्च करावी लागत आहे.



शास्त्रज्ञांच्या मते, ध्रुवीय अस्वलांबाबत असे होण्यास या भागातील बर्फ वितळणेहेच कारण जबाबदार आहे. एकवेळ आर्क्टिक हे ध्रुवीय अस्वलांसारख्या अनेक जीवांसाठी एक सुरक्षित निवास होते. मात्र, ग्लोबल वॉर्मिंगमुळे या प्राण्यांना दिवसेंदिवस जगणेही अवघड बनू लागले आहे. यासंबंधीचे संशोधन 'एक्सपिरीमेंटल बायोलॉजी'मध्ये प्रसिद्ध केले आहे. ◆◆◆



## मंडईतील कचऱ्यापासून वीजनिर्मिती

भाजी मंडईतील टाकलेल्या भाज्या व अन्य कचरा बऱ्याच समस्या निर्माण करीत असतो. मात्र, हैदराबादमधील बोवेनपल्ली येथील भाजी मंडई याच कचऱ्याचा वीजनिर्मितीसाठी वापर करीत आहे. तेथील भाज्या, फळे व फुलांचा कचरा फेकला जात नाही तर त्याचा वापर वीज आणि बायोगॅस बनवण्यासाठी होतो.

बोवेनपल्ली मंडईत रोज सुमारे दहा टन कचरा गोळा होतो. असा कचरा काही काळापूर्वी लँडफिलमध्ये टाकला जात असे. आता तेथील जैविक कचऱ्यापासून रोज सुमारे ५०० युनिट वीज निर्माण होत आहे. तसेच ३० किलो बायोगॅसही बनवला जात आहे. तेथील कचऱ्यापासून बनलेल्या विजेचा वापर रस्त्यावरील शंभर दिवे, १७० स्टॉल्स, एक प्रशासकीय भवन आणि पाणीपुरवठा यंत्रणेसाठी केला जातो. उत्पादित बायोगॅस मंडईतील कॅंटिनमध्ये स्वयंपाकासाठी पुरवला जातो. मंडईतील जैविक कचरा आधी कन्वेजर बेल्टवर ठेवला जातो. तो कचरा बारीक करतो आणि नंतर त्याचे रूपांतर एका लगद्यात होते. हा लगदा अपघटनासाठी मोठे कंटेनर किंवा खड्ड्यांमध्ये टाकला जातो. त्याचे रूपांतर जैविक इंधनात होते. त्याचा शंभर टक्के बायोगॅसने चालणाऱ्या जनरेटरमध्ये वापर केला जातो. त्यापासून विजेची निर्मिती केली जाते. हैदराबादमधील सीएसआयआर-इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी (आयआयसीटी) ने हा उपक्रम केला आहे. ◆◆◆

## २००० वर्षांपूर्वीचे वाहन

इटलीतील पुरातत्त्ववाद्यांनी जमिनीखाली गाडले गेलेले प्राचीन शहर पोम्पईच्या बाह्यवर्ती भागातील एका विलामधून सुमारे १९४२ वर्षांपूर्वीची प्राचीन 'रोमन सेरेमोनियल' गाडीचा (कार) शोध लावला आहे. पुरातत्त्ववाद्यांच्या मते, या गाडीचा वापर उत्सव अथवा खास समारंभादरम्यान करण्यात येत असे. इटलीतील पोम्पई हे शहर इ.स. ७९ मध्ये ज्वालामुखीच्या स्फोटामुळे लाव्हारसाखाली गाडले गेले होते.

प्राचीन गाडी सापडणे म्हणजे हा एक अद्भूत शोध असल्याचे इटलीच्या सांस्कृतिक मंत्रालयाने म्हटले आहे. लोखंड, कास्य आणि टीनपासून तयार करण्यात आलेल्या या गाडीची चारही



चाके अत्यंत सुरक्षित आहेत. प्राचीन शहर पोम्पईच्या संरक्षक भिंतीपासून उत्तर दिशेला सुमारे ७०० मीटर अंतरावरील सिविता गिऊलियानामधील एका प्राचीन विलामध्ये ही गाडी सापडली आहे. या भागात अशा प्रकारचे प्राचीन वाहन सापडणे ही पहिलीच घटना आहे.

प्राचीन पोम्पई शहराचे अभ्यासक आणि संचालक मास्सिमो ओस्ना यांनी सांगितले की, आजपर्यंत आम्हाला प्रवासी आणि साहित्य वाहून नेणारी वाहने आढळून आली होती. मात्र, यावेळी आम्हाला समारंभ अथवा उत्सवादरम्यान वापरण्यात येणारी गाडी मिळाली. दरम्यान, नेपल्सपासून २३ कि.मी. अंतरावर स्थित तत्कालीन पोम्पईमध्ये १३ हजार लोक राहत होते. इ. स. ७९ मध्ये ज्वालामुखीमुळे हे शहर लाव्हाखाली गाडले गेले. ◆◆◆

## नऊशे वर्षांपासून सुरक्षित पार्थिव

तामिळनाडूतील श्रीरंगम येथील श्रीरंगनाथस्वामी मंदिर हे जगातील सर्वात मोठ्या व प्राचीन हिंदू मंदिरांपैकी एक आहे. हे मंदिर अख्ख्या गावालाच व्यापलेले आहे. तब्बल १५५ एकर जागेतील या भव्य मंदिरात २१ उत्तुंग गोपूर (प्रवेशद्वार) असून त्यामध्येच जगातील सर्वात उंच गोपुराचाही समावेश आहे. याच मंदिरात विशिष्टाद्वैत तत्त्वज्ञानाचे प्रणेते श्री रामानुजाचार्य यांचा पवित्र पार्थिव देह गेल्या सुमारे ९०० वर्षांपासून जतन करून ठेवण्यात आलेला आहे. वयाच्या १२० व्या वर्षी रामानुजाचार्यांनी याच ठिकाणी इसवी सन ११३७ मध्ये आपला देह ठेवला होता.

रामानुजाचार्यांनी भक्तिमार्गाचा मोठाच प्रसार केला व त्याला तात्त्विक बैठकही दिली. आपल्या दीर्घायुष्यात त्यांनी 'विशिष्टाद्वैत' मतानुसार ब्रह्मसूत्र



आणि श्रीमद् भगवद्गीतेवर भाष्य लिहून भक्तीचा प्रसार केला. इसवी सन १०१७ मध्ये त्यांचा तामिळनाडूतील श्रीपेरुम्बुदूर येथे जन्म झाला. 'अद्वैत' मताचे प्रणेते आद्य शंकराचार्य केरळमध्ये कलाडी गावात जन्मले तर 'द्वैत' मताचे प्रणेते मध्वाचार्य कर्नाटकात उडुपीजवळ जन्मले.

शुद्धाद्वैत मताचे प्रणेते वल्लभाचार्य आणि द्वैताद्वैत मताचे प्रणेते निम्बार्काचार्यही मूळचे दक्षिण भारतातीलच होते. श्रीरंगम हे वैष्णव भक्तिमार्गाचे एक प्रमुख ठिकाण होते व याच ठिकाणी रामानुजाचार्यांचे कार्य घडले. याच ठिकाणी त्यांचा पार्थिव देह विशिष्ट लेप लावून सुमारे नऊशे वर्षे जतन करून ठेवलेला आहे. या लेपामध्ये अर्थातच कोणत्या रसायनांचा वापर होत नाही तर चंदन, कापूर व केशरसारख्या काही पदार्थांचा वापर केला जातो. वर्षातून दोनवेळा हा लेप लावला जातो व गेल्या ८८४ वर्षांपासून ही परंपरा पाळली जाते.

त्यांच्या धातूच्या एका मूर्तीमागे हा पार्थिव देह बैठी, वरदमुद्रेत असून तो सर्व भाविकांना पाहता येतो. ◆◆◆

## ८१ वर्षांनंतर बॉम्बचा स्फोट

दुसऱ्या महायुद्धानंतर माजलेल्या हाहाकाराचा ध्वनी आता ८१ वर्षांनंतरही ऐकू आला आहे. ब्रिटनची राजधानी लंडनजवळील एक्सेटर शहरात ९०० किलो वजनाचा एक बॉम्ब सापडला. हा बॉम्ब दुसऱ्या महायुद्धातील होता आणि त्याला निकामी करण्यासाठी सगळे शहर रिकामे करावे लागले. त्याच्या स्फोटाने हे शहर हादरून गेले.

एक्सेटर शहराच्या एका रहिवासी परिसरात हा बॉम्ब आढळल्याची सूचना पोलिसांना मिळाली होती. एक्सेटर युनिव्हर्सिटीच्या कंपाऊंडमध्ये हा बॉम्ब होता. त्यानंतर बॉम्ब निकामी करणार्या पथकाला बोलावण्यात आले. पोलिसांनी त्यावेळी सर्व शहर रिकामे केले. विद्यापीठाच्या १४०० विद्यार्थ्यांसह ग्लेनथोर्न रोडच्या परिसरात राहणार्या सुमारे २६०० घरांमधील लोकांना सुरक्षितस्थळी हलवण्यात आले. रिमोट कंट्रोलच्या माध्यमातून हा बॉम्ब निकामी करण्यात आला. त्यावेळी झालेला स्फोट इतका मोठा होता की त्याचा आवाज दहा किलोमीटरपर्यंत ऐकू आला. अनेक



घरांच्या खिडक्यांच्या काचा फुटल्या! अनेक घरे पडण्याच्या स्थितीत आली आहेत. त्यामुळे लोकांना शहरात जाऊ दिलेले नाही. हा बॉम्ब जर्मनीच्या नाझी सैन्याने एक्सेटर शहरावर टाकलेला असावा असे म्हटले जाते. शहरात असे आणखीही बॉम्ब असू शकतील या शक्यतेने लोकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. या बॉम्बच्या स्फोटाचा व्हिडीओ आता व्हायरल झाला आहे. ◆◆◆



## 'कान' देऊन ऐका!


जागतिक आरोग्य संघटनेने म्हटले आहे की २०५० पर्यंत जगातील एक चतुर्थांश लोकसंख्या बहिरेपणाच्या समस्येची शिकार बनू शकते. संभाव्य धोक्याबाबत जनजागृती व उपचार करण्यासाठी योग्य ती पावले उचलावी लागतील असे याबाबतच्या एका अहवालात म्हटले आहे.

संक्रमण, आजार, जन्मजात दोष, ध्वनिप्रदूषण आणि जीवनशैलीतील त्रुटी यामुळे ही स्थिती बिघडू शकते असे संघटनेच्या एका अहवालात म्हटले आहे. त्यामध्ये काही गरजेच्या उपाययोजनांची माहितीही देण्यात आली आहे. त्यासाठी प्रतिव्यक्ती १.३३ डॉलर्सचा वार्षिक खर्च येऊ शकतो असेही संघटनेने म्हटले आहे. जर वेळीच याबाबत उपाययोजना केल्या नाहीत तर स्थिती आणखी वाईट होऊ शकते. आरोग्य क्षेत्राबरोबरच संचार, शिक्षण आणि रोजगाराच्या क्षेत्रावरही त्याचे विपरित परिणाम होऊ शकतात. सध्या जगभरातील वीस टक्के लोक बहिरेपणाच्या समस्येचा सामना करीत आहेत. येत्या तीन दशकांच्या काळात अशा लोकांच्या संख्येत दीडपट वाढ होऊ शकते. २०१९ मध्ये हा आकडा १.६ अब्ज होता. तो २०५० पर्यंत वाढून २.५ अब्ज होण्याचा धोका आहे. ◆◆◆

## लाव्हा नव्हे, धबधबा!

अमेरिकेतील योसेमाईट व्हॅलीतील 'फायरफॉल' या नावाने ओळखला जाणारा धबधबा नेहमी पर्यटकांचे आकर्षण बनलेला असतो. जणू काही ज्वालामुखीचा लाव्हारस डोंगरावरून खाली येत असावा असे त्याला पाहून वाटते. मात्र, हा तप्त लाव्हारस नसून तो साधा पाण्याचा धबधबाच आहे. मावळतीच्या सूर्याची किरणे धबधब्याच्या पाण्यावर पडली की असा आभास निर्माण होतो!

दरवर्षी फेब्रुवारी-मार्चमध्ये असे दृश्य पाहायला मिळते. योसेमाईट व्हॅलीमध्ये हा दोन हजार फूट उंचीचा धबधबा आहे. दरवर्षी फेब्रुवारी-मार्चमध्ये हा 'फायरफॉल' पाहण्यासाठी लोकांची गर्दी असते; पण यंदा कोरोना महामारीमुळे तिथे तुरळक पर्यटक आहेत. ऑनलाईन बुकिंगनंतर तिथे मोजक्याच पर्यटकांना प्रवेश दिला जातो. नॅशनल पार्क सर्व्हिसने म्हटले आहे की हा धबधबा हिवाळ्यात तसेच वसंत ऋतूत पाहण्यासारखा असतो. जर हवामान योग्य असले तर सूर्याची किरणे कोसळणाऱ्या धबधब्याच्या पाण्यावर पडून हा धबधबा नारंगी रंगात चमकू लागतो. दूरवरून पाहिल्यावर जणू काही तप्त रस पडत असल्यासारखे दृश्य दिसते. ◆◆◆





## विशाल डायनासोरचे जीवाश्म

अर्जेंटिनामध्ये उत्खननात विशाल डायनासोरचे जीवाश्म सापडले आहे. हा डायनासोर 'टायटॅनोसॉरस' प्रजातीचा होता. पृथ्वीच्या इतिहासातील सर्वात मोठ्या आकाराच्या प्राण्यांमध्ये त्याचा समावेश होतो.

संशोधकांनी सांगितले की हे जीवाश्म १४० दशलक्ष वर्षांपूर्वीचे आहे. 'निन्जाटायटॅन झॅपाटाई' या टायटॅनोसॉरसचे हे जीवाश्म आहे. या समूहातील डायनासोरची मान अतिशय लांब असे व चार पाय चार खांबांसारखेच असत. हे प्राणी शाकाहारी होते. सध्या या प्राण्याच्या जीवाश्माचा अर्धाच भाग सापडला आहे. हे डायनासोर पृथ्वीवर ९.८ कोटी वर्षांपूर्वी वावरत होते. दक्षिण अमेरिकेत एके काळी असे डायनासोर मोठ्या संख्येने होते.

त्याच्या जीवाश्मामध्ये मणक्याची २४ हाडे सापडली आहेत. ही हाडे त्याच्या लांबलचक शेपटीचा एक भाग असावीत. त्याच्या कटीप्रदेश व छातीच्या भागाचीही काही हाडे सापडली आहेत. ◆◆◆

## ममी बनवण्याचे रहस्य

इजिप्तमधील प्राचीन पिरॅमिड, कबरी आणि त्यामधील तीन हजारांपेक्षाही अधिक वर्षांपूर्वीच्या लोकांचे 'ममी' बनवून ठेवलेले मृतदेह जगभरातील लोकांच्या कुतुहलाचा विषय असतात. एखाद्या व्यक्तीचा मृतदेह दीर्घकाळ जतन करून ठेवण्यासाठी त्याच्यावर विशिष्ट लेप लावून व प्रक्रिया करून 'ममी' बनवली जात असे. या प्रक्रियेची माहिती ३५०० वर्षांपूर्वीच्या एका ग्रंथात आहे.

कोपेनहेगन युनिव्हर्सिटीतील संशोधकांनी या हस्तलिखित पोथीच्या आधारे या प्रक्रियेचे रहस्य उलगडून दाखवले आहे. ही पोथी सध्या पॅरिसमध्ये ठेवण्यात आलेली आहे. प्राचीन काळी इजिप्तमध्ये मृतदेहावर लेप लावण्याची कला अत्यंत पवित्र मानली जात असे. मनुष्य याच देहाने मृत्यूनंतरचे जीवनही जगतो अशी तेथील लोकांची कल्पना असल्याने ते देह जतन करून ठेवत असत. तसेच देहाजवळ दैनंदिन गरजेच्या व सुखसोयीच्या वस्तूही ठेवत. मृतदेह जतन करण्यासाठी विशिष्ट गुप्त



प्रक्रिया शक्यतो मौखिक स्वरूपात अन्य व्यक्तीस शिकवली जात असे. मात्र, या ग्रंथात ती लिखित स्वरूपातही आढळणे हे एक दुर्मीळ उदाहरण आहे.

कोपेनहेगन युनिव्हर्सिटीतील सोफी चिओइट यांनी हा ग्रंथ संपादित केला आहे. लेप आणि विभिन्न प्रकारच्या पट्ट्यांचा वापर याची यामध्ये माहिती आहे. त्यामधील काही भाग सोफी यांनी प्रसिद्ध केला असून काही भाग पुढील वर्षी प्रसिद्ध केला जाणार आहे. एकूण ७० दिवसांमध्ये ममी बनवण्याची प्रक्रिया पूर्ण केली जात असे. ३५ दिवस मृतदेह सुकवला जाई व ३५ दिवसांमध्ये त्यावर पट्ट्या लपेटल्या जात असत. मृतदेहावर दर चार दिवसांनी विशिष्ट औषधी लेप लावला जात असे.

पहिला लेप लावल्यावर चार दिवसांनी शरीरातील मेंदू व अन्य अवयव बाहेर काढले जात असत. ७० दिवसांच्या प्रक्रियेत ६८ व्या दिवशी ममी तयार होत असे व तिला शवपेटीत ठेवले जाई. या ७० दिवसांच्या काळात सतरा वेळा मिरवणूक काढून उत्सव साजरा केला जाई. या प्रक्रियेची माहिती देणारा ग्रंथ सहा मीटर लांबीचा असून तो इसवी सनपूर्व १४५० या काळातील असल्याचे मानले जाते. त्याला 'लुव-कार्ल्सबर्ग पॅपिरस' असे नाव दिले आहे. त्यामध्ये वनौषधींच्या सहाय्याने उपचार व त्वचेच्या आजारांबाबत अधिक माहिती आहे. ◆◆◆

## काँग्रेसचा आंदोलनाला पाठिंबा

# पाण्यासाठी दावडी भागातील रहिवाशांचा हंडा-कळशी मोर्चा



**डोंबिवली : कल्याण-डोंबिवली महापालिका आणि एमआयडीसी प्रशासन डोंबिवली यांच्या कात्रीत सापडून सामान्य नागरिकांची होरपळ होत आहे. गेली पाच वर्ष पाणी टंचाईचा सामना करणाऱ्या डोंबिवली जवळील दावडी येथील तुकाराम चौकातील मधुकर कॉम्प्लेस व दिशा संकुल येथील रहिवाशांनी इमारतीच्या आवारात हंडा-कळशी वाजवून पालिका प्रशासनाचा जाहीर निषेध केला.**

येथील रहिवाशांचा पाणीप्रश्न सुटण्यासाठी काँग्रेसने पाठिंबा देत आंदोलनात सहभागी झाले. पाणी मिळत नसेल तर मतदानावर बहिष्कार टाका असे यावेळी काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी सांगितले. डोंबिवली पूर्वेकडील दावडीजवळील तुकाराम चौक येथील मधुबन गॅलक्सी कॉम्प्लेक्स व दिशा संकुल येथील सुमारे 300 कुटुंबीय गेली पाच वर्ष पाणीप्रश्न सुटावा म्हणून पालिका प्रशासनाकडे पाठपुरावा करत आहेत. या सोसायट्या पाणी टँकरसाठी वर्षाला तीन लाख रुपये खर्च करतात. पालिका प्रशासन लक्ष देत नसल्याने अखेर गुरुवारी येथील रहिवाशांनी इमारतीच्या आवारात हंडा-कळशी वाजवून प्रशासनाचा जाहीर निषेध केला.

यावेळी जिल्हा उपाध्यक्षा वर्षा गुजर-जगताप, जिल्हा उपाध्यक्ष शिबू शेख, जिल्हा सरचिटणीस सुजाता परब, सोनिया गांधी ब्रिगेडीयर्स प्रदेश अध्यक्ष रीमा खांडेकर आणि कार्यकर्ता लवेश कुबल यांनी आंदोलनात सहभागी होऊन पाठिंबा दिला. जिल्हा उपाध्यक्षा वर्षा गुजर-जगताप म्हणाल्या, नागरिकांना पाणी मिळणे हा त्यांचा हक्क आहे. रहिवाशांना पाणी देण्यास हे प्रशासन कमी पडत आहे. त्यामुळे आगामी पालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीत रहिवाशांनी मतदानावर बहिष्कार टाकावा. जिल्हा उपाध्यक्ष शेख म्हणाले, पालिका अधिकाऱ्यांनी खुर्ची खाली करावी. तर येथील रहिवाशी मीना सिंग म्हणाल्या, जर पाणीच देऊ शकत नाहीत तर पालिकेकडून इमारतीच्या बांधकामांना का परवानगी दिली जाते. नीलम वायळ म्हणाल्या, आम्ही राहण्यास आलो तेव्हापासून पाणी टंचाईचा सामना करावा लागत आहे. पालिका कर घेऊनही पाणी का मिळत नाही? येथील रस्त्यावर पथदिवे नाही. कचरा प्रश्न सुटला नाही. इतकी वर्ष त्रास आता सहन करु शकत नाही. दरम्यान या आंदोलनानंतर पालिका प्रशासन जागे झाले नाहीत तर आम्हाला पुढील आंदोलनाची दिशा ठरवावी लागेल असा निर्णय यावेळी आंदोलन करणाऱ्या रहिवाशांनी घेतला.



पूर्व द्रुतगती महामार्गावरील कोपरी पुलाच्या चार मार्गिका वाहतुकीसाठी खुल्या झाल्या असल्या तरी अपेक्षेप्रमाणे या मार्गावरील वाहनांची गर्दी काही केल्या कमी होत नाही. वाहतूक कोंडीमुळे ठाणे-मुंबईकरांचे होणारे हाल कधी संपणार असा प्रश्न उपस्थित होऊ लागला आहे.

## भाजपा व युगंधर प्रतिष्ठानच्या वतीने नवदुर्गा पुरस्कार सोहळा



**ठाणे : भाजपा ठाणे शहर आणि युगंधर प्रतिष्ठान यांच्या वतीने नवदुर्गा पुरस्कार सोहळा व महिलांसाठी खेळ मांडीयेला या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.**

नवरात्र उत्सवाचे औचित्य साधून कोरोना संकटाच्या काळात आदिशक्तीचे रुप धारण करून कुटुंबाच्या सुखासाठी जिवाचे रान करणाऱ्या नवदुर्गांचा सत्कार भाजपा ठाणे शहर आणि युगंधर प्रतिष्ठान यांच्या वतीने व प्रतिष्ठानचे अध्यक्ष योगेश भोईर व भक्ती भोईर यांच्या पुढाकाराने गोकुळनगर येथील वर्धमान हॉल येथे आयोजित करण्यात आला होता.

यामध्ये विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा भाजपा महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष माधवी नाईक व प्रदेश सचिव संदीप लेले यांच्या हस्ते पुरस्कार देऊन गौरवण्यात आले. यावेळी भाजपाचे पदाधिकारी उपस्थित होते. गेली दोन वर्षे कोविड काळात घरात अडकून पडलेल्या महिलांना आनंद मिळावा या हेतूने खास महिलांसाठी " खेळ मांडीयेला" या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये महिलांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला.

# कल्याण ग्रामीण विधानसभा क्षेत्रातील तीन प्रभागांत विकासकामांचा धडाका

## आमदार राजू पाटील यांच्या निधीतून 1 कोटी 80 लाखांच्या कामांचे भूमिपूजन

कल्याण : कल्याण ग्रामीण विधानसभा क्षेत्रातील कल्याण पूर्व भागातील तीन प्रभागांत विकासकामांचा धडाका उडाला असून मनसे आमदार राजू पाटील यांच्या आमदार निधीतून 1 कोटी 80 लाखांच्या कामांचे भूमिपूजन आज करण्यात आले.

कल्याण ग्रामीणमधील लोकग्राम, मेट्रोमॉल, नेतिवली टेकडी, कचोरे या प्रभागांत विविध विकासकामांचे आमदार राजू पाटील यांच्याहस्ते भूमिपूजन करण्यात आले.

या भूमिपूजन कार्यक्रमात राजू पाटील यांनी शिवसेनेवर जोरदार टीका केली. विकासकामांच्या गुणवत्तेबाबत लोकांचा रोष झाला तर कोणाला तरी निलंबित करायचं, पुन्हा त्याला कामावर घ्यायचे व आपले काम पुन्हा सुरु करायचे. मात्र संबंधित अधिकाऱ्यावर कारवाई करायची नाही अशी या शिवसेनेची भूमिका असल्याचा आरोप राजू पाटील यांनी केला. त्याचप्रमाणे कल्याणच्या ऐतिहासिक स्वर्गीय बाळासाहेब



ठाकरे कला केंद्र यासारख्या अनेक वास्तु आहेत ज्या बीओटी तत्त्वावर घेतल्या आहेत मात्र त्यांचा कुठलाही उपयोग होत नाही. याचा अर्थ बीओटी तत्त्वावर घ्यावे आणि पीपीपी म्हणजे खा खा खा धंदे करण्याचे काम सत्ताधारी शिवसेना करत असल्याची टीका राजू पाटील यांनी केली.

## कृषी उत्पन्न बाजार समितीने बजावली कारणे द्या नोटीस

### मोबाईल टॉवर वीज चोरी प्रकरण

कल्याण : कल्याण पश्चिमेच्या एपीएमसी मार्केटमधील इमारतीच्या छतावर असलेल्या एअरटेल कंपनीच्या मोबाईल टॉवरसाठी फिडर पिलरमधून थेट वीजचोरी होत असल्याची घटना उघडकीस आली होती.

गेल्या सहा महिन्यांत या टॉवरसाठी 8 लाख 19 हजार रुपये किंमतीची तब्बल 56 हजार 150 युनिट वीज चोरुन वापरल्याबद्दल मे. सुयोग टेलेमॅटिक्स विरुद्ध महावितरणने महात्मा फुले चौक पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला असून या बाबत कल्याण कृषी उत्पन्न बाजार समितीने संबंधित मोबाइल कंपनींना कारणे द्या नोटीस बजावली असल्याची माहिती कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती कपिल थळे यांनी दिली.

वीजचोरी शोध मोहिमेत महावितरणच्या पथकाने 8 ऑक्टोबर रोजी कल्याण कृषी उत्पन्न बाजार समितीतील सी टाइप इमारतीच्या छतावरील मोबाईल टॉवरच्या वीजपुरवठ्याची तपासणी केली. त्यामध्ये याठिकाणी अधिकृत वीजजोडणी न घेता विनामीटर थेट वीजवापर होत असल्याचे आढळले. या मोबाईल टॉवरसाठी काळ्या रंगाची 40 मीटर केबल वापरुन महावितरणच्या फिडर पिलरमधून थेट आणि अनधिकृतपणे वीजचोरी केल्याचे तपासणीतून उघड झाल्याचे पोलीस ठाण्यात दाखल फिर्यादीमध्ये नमूद करण्यात आले आहे. तर 18 मे पासून वीजचोरीचा हा प्रकार सुरु असल्याचे निष्पन्न झाले आहे. त्यानुसार वीजचोरीचे देयक आणि दंड भरण्याबाबत सुयोग टेलेमॅटिक्सला नोटीस बजावण्यात आली. परंतु संबंधित रकमेचा भरणा न झाल्याने सुयोग टेलेमॅटिक्स विरुद्ध सहायक



अभियंता खान यांनी फिर्याद दिली.

या फिर्यादीवरुन महात्मा फुले चौक पोलिसांनी वीज कायदा 2003 च्या कलम 135 नुसार सुयोग टेलेमॅटिक्स विरोधात वीजचोरीचा गुन्हा दाखल केला आहे. मे. सुयोग टेलेमॅटिक्स या कंपनीला मोबाईल टॉवर बसविण्याची परवानगी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वतीने देण्यात आली होती. हि परवानगी देतांना विद्युत मीटर घेण्याची जवाबदारी संबंधित कंपनीला देण्यात आली होती. मात्र त्यांनी तसे न करता थेट वीज पुरवठा केला. ही बाब महावितरणच्या लक्षात येताच महावितरणने संबंधित कंपनीवर गुन्हा दाखल केला. ही बाब आम्हाला समजताच कल्याण कृषी उत्पन्न बाजार समितीने संबंधित मोबाइल कंपनींला कारणे द्या नोटीस बजावली असून त्यांच्या उत्तरानंतर योग्य कारवाई करणार असल्याचे सभापती कपिल थळे यांनी सांगितले.

# अंबरनाथचे 'बिग सिनेमा' रसिकांसाठी सज्ज

### बेलबॉटम, जेम्स बॉण्ड होणार प्रदर्शित

**अंबरनाथ: बेलबॉटम, व्हेनमसारख्या नव्या कोऱ्या चित्रपट प्रदर्शित करत येथील बिग सिनेमाचा पडदा उद्यापासून पुन्हा एकदा उघडला जाणार आहे. चित्रपटगृह रसिकांसाठी पुन्हा सज्ज झाले आहे.**

कोरोनाची दुसरी लाट ओसरु लागल्यामुळे राज्यातील चित्रपटगृहे आणि नाट्यगृहे उद्या शुक्रवारपासून पुन्हा रसिकांसाठी सुरु करण्यास शासनाने परवानगी दिली आहे. कोरोनाच्या परिस्थितीमुळे अन्य चित्रपटगृहांप्रमाणे सुमारे दीड वर्षांपासून बंद असलेल्या विमको नाक्यावरील स्टार मिराज संचालित बिग सिनेमागृहात चार



स्क्रीन असून उद्या शुक्रवारी तीन स्क्रीन सुरु करण्यात येणार आहेत. बेलबॉटम, व्हेनम (थ्री डी) तसेच जेम्स बॉण्ड आणि तमिळ भाषेतील डॉक्टर या चित्रपटाद्वारे पुनश्च हरिओम करण्यात येणार आहे.

बिग सिनेमागृहातील तीन सिनेमागृहाची आसन क्षमता 750 आहे, मात्र कोरोनाच्या नियमानुसार 50 टक्के क्षमतेने सिनेमागृहे चालवली जाणार आहेत. पूर्ण चित्रपटगृहाचे सॅनिटायझरिंग करण्यात आले आहे, स्वच्छता देखील करण्यात आली आहे. कोरोनाच्या नियमांचे पालन केले जाणार आहे. त्याचप्रमाणे शासनाकडून जसे जसे नियम शिथिल होतील त्यानुसार सिनेमागृहात बदल केले जातील असे व्यवस्थापनातर्फे स्पष्ट करण्यात आले. चित्रपटगृहातील सर्व कर्मचाऱ्यांचे लसीकरण करण्यात आले आहे, आज गुरुवार (21) रोजी एका चित्रपटाद्वारे चाचणी करण्यात आली आहे.

मुंबई सागा, रुही आणि गॉडझिला वि कॉंग चित्रपट सुरु असताना लॉकडाऊन जाहीर झाला आणि चित्रपटगृहे बंद ठेवण्यात आली होती. बिग सिनेमामध्ये अंदाजे 55 कर्मचारी कामगार आहेत.

## जिल्ह्यात दिवसभरात ३८ हजार नागरिकांचे लसीकरण

**ठाणे : कोरोना प्रतिबंधात्मक लसीकरण मोहिमेत ठाणे जिल्ह्यात कोविन पोर्टलवरील नोंदीनुसार आज रात्री नऊपर्यंत 38 हजार 606 नागरिकांचे लसीकरण करण्यात आले.**

जिल्ह्यात आतापर्यंत एकूण 78 लाख 96 हजार 739 नागरिकांचे लसीकरण करण्यात आले असून त्यापैकी 53 लाख 27 हजार 665 नागरिकांना पहिल्या डोसचे तर 25 लाख 69 हजार 74 नागरिकांना दुसरा डोस देण्यात आला आहे. आज दिवसभरात लसीकरणाचे सुमारे 474 सत्र आयोजित करण्यात आले.

## राष्ट्रभाषा प्रचार समिती वर्धाच्या सहाय्यक मंत्री पदी महेश अग्रवाल यांची नियुक्ती

मुंबई - राष्ट्रभाषा प्रचार समिती वर्धाच्या कार्यकारी समितीच्या निवडणुकीत सहाय्यक मंत्री पदासाठी महेश अग्रवाल यांची 2021 ते 2024 या वर्षासाठी नियुक्ती करण्यात आली आहे. महात्मा गांधींनी स्थापन केलेली राष्ट्रभाषा प्रचार समिती हिंदी भाषिक प्रांत, राज्ये आणि परदेशातही गेल्या 85 वर्षांपासून हिंदी पुस्तके व मासिकांचे प्रकाशन, प्राथमिक, प्रारंभिक, प्रवेश, परिचय, कोविड, राष्ट्रभाषा रत्न, राष्ट्रभाषा आचार्य इत्यादी परीक्षा आयोजित करीत आहे. ही संस्था हिंदीच्या प्रचारात अग्रणी भूमिका बजावत आहे. या संस्थेचे संस्थापक सदस्य डॉ. राजेंद्र प्रसाद, पं. जवाहरलाल नेहरू, नेताजी सुभाषचंद्र बोस, सदरदार वल्लभभाई पटेल, जमनलाल बजाज, राजर्षी पुरुषोत्तम टंडन, पं. मखनलाल चतुर्वेदी, श्रीमन्नारायण अग्रवाल इत्यादी प्रमुख व्यक्ती या संस्थेशी संबंधित आहेत. महेश अग्रवाल 30 वर्षांहून अधिक काळ राष्ट्रभाषा



प्रचार समितीमध्ये कार्यरत आहेत संबंधित आहेत. गेल्या 2018 ते 2021 पर्यंत ते प्रसिद्धी मंत्री होते. महेश अग्रवाल यांना आजपर्यंत जे काही काम देण्यात आले आहे, ते काम त्यांनी अतिशय चांगल्या प्रकारे पुढे नेले आहे. असे समितीचे मत आहे. समितीच्या पदाधिकाऱ्यांपासून सर्व सदस्यांनी सहाय्यक मंत्री झाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले आणि त्यांनी केलेल्या कामाचे कौतुक केले. महेश अग्रवाल यांनी आपल्या अनुभवाच्या आणि कार्यशक्तीच्या बळावर हे स्थान मिळवले आहे. राष्ट्रभाषा प्रचार समिती, वर्धाचे सहाय्यक मंत्री म्हणून निवड झाल्यावर महेश अग्रवाल म्हणाले की, समितीकडून मला जी कोणतीही जबाबदारी दिली जाईल ती व्यवस्थित पार पाडण्यास मी नेहमीच प्रयत्न करेन, हिंदीच्या प्रचार आणि प्रसारासाठी मी जास्तीत जास्त योगदान देईन.

# पवईमध्ये नायट्रो बेस्पोक फिटनेस जिमचे भव्य उदघाटन





**ठाणे : पवई येथे नुकतेच नायट्रो बेस्पोक फिटनेस जिमचे उद्घाटन फिटनेस आयकॉन आणि अभिनेता सुनील शेट्टी आणि गृहमंत्री दिलीप वळसे पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी दिव्यांग शरीर निर्माण करणारा, खेळाडू, प्रशिक्षक, क्रीडा व्यक्ती यांचा सत्कार करण्यात आला.**

नाइट्रो आंतरराष्ट्रीय दर्जाच्या फिटनेस जिम ही सगळ्या सुविधांची प्रदान करते. ज्यात बाह्य स्विमिंग पूल, उत्कृष्ट टॉप एंड कार्डिओ उपकरणे, ताकद प्रशिक्षण क्षेत्र विनामूल्य वजन, अनेक गट व्यायाम स्टुडिओ-ऑफर एरियल आणि हॉट योगा, एरोबिक्स, झुम्बा, एमएमए, ग्रुप सायकलिंग, पायलेट्स, क्रॉस फिट, इत्यादी स्वतंत्र आणि खाजगी कार्यात्मक प्रशिक्षण क्षेत्र - घराच्या आत आणि बाहेर दोन्ही, योगाच्या जागा-दोन्ही इनडोअर आणि आउटडोअर, स्पा आणि सलून, पौष्टिक कॅफे, थेट डीजे फिटनेस क्लबला सर्वाधिक मागणी करण्यासाठी जागा पूरक आहे. मुंबई-दक्षिण मुंबई, पवई, ठाणे (पूर्व आणि पश्चिम) आणि पुण्यातील कल्याणी नगर, वाकड, कोथरुड, सिंहगड रोड, नाइट्रो येथील आउटलेटसह, जगातील सर्वात वेगाने वाढणारा फिटनेस ब्रँड गुणवत्ता सुनिश्चित करण्यावर विश्वास ठेवतो. समग्र फिटनेस आणि आरोग्यासाठी उच्च दर्जाची सेवा प्रदान करताना सेवा आणि लक्झरी. त्यांच्या उपकरणांची निवड त्यांच्या प्रशिक्षण आणि फिटनेस विभागाद्वारे केली जाते. अमेरिकन मिलिटरी आणि मँचेस्टर युनायटेड आणि जर्मन फुटबॉल संघ आणि शीर्ष संस्थेद्वारे प्रमाणित प्रशिक्षकांद्वारे समान उपकरणे वापरली जातात.

नायट्रो फिटनेस जिमचे नायट्रो फिटनेस अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक प्रबोध डावखरे एक नामांकित राजकीय आणि रिअल इस्टेट पार्श्वभूमीतून आलेले आहेत. ते एक प्रतिष्ठित, तरुण, उत्साही आणि स्वयंप्रेरित उद्योजक आहे. ते उत्कृष्टतेसाठी कठोर परिश्रम घेण्यावर विश्वास ठेवतात. "आम्ही फिटनेस इंडस्ट्रीच्या क्रांतीसाठी झटत आहोत आणि जिम काय असू शकतो याची धारणा बदलण्यासाठी आम्ही येथे आहोत, आम्ही अपरिवर्तनीय आहोत आणि त्याच वेळी अभिमान बाळगतो", असे त्यांनी सांगितले.

मिलिंद बल्लाळ यांची चिंतनशील कादंबरी !




सतत धावणारी, कधीच न झोपणारी, आर्थिक राजधानी, मोहनगरी... मायानगरी...... स्वप्ननगरी... अंडरवर्ल्डची.... कुणालाही न कळलेली... वाहती.. झगमगाटी... काम करणाऱ्याला उपाशी झोपू न देणारी... मुंबई! रोज शेकडो लोक जिच्याकडे धाव घेतात आणि जी त्यांना आपल्या विशाल उदरात सामावून घेते... लगतच्या समुद्रासारखी... ती मुंबई! सतत आकर्षणाचा, चर्चेचा कुतूहलाचा केंद्रबिंदू असलेली... जणू काही एखादी 'अनसुलझी' पहेलीच ! 'पेव्हरब्लॉक' ही कादंबरी म्हणजे या मुंबईचं जणू आक्रंदनच आहे.

-अभिराम भडकमकर
नाटककार

कोव्हिडनंतर आपल्या शहरांचे होणार तरी काय? ज्यांच्याबद्दल आकस आणि दुराग्रह बाळगला त्या परप्रांतीयांवर किती अवलंबून रहायचे? भूमीपुत्रांचे आणि नेत्यांचे नेमके चुकले कुठे? अनुभवाचे खडे बोल सुनावून अंजन घालणारी कादंबरी!

या ठिकाणी उपलब्ध

ॲमेझॉन ■ मॅजेस्टीक बुक डेपो, ठाणे ■ ठाणेवैभव कार्यालयात उपलब्ध